# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, सोलापूर.

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१)(ब) अंतर्गत १७ बाबींची जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूरबाबत माहिती.

**बाब कमांक : १**:— सोलापूर येथील सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामाचा व कर्तव्याचा तपशिल

अ. सार्वजनिक प्राधिकरणाचे नांव व पत्ता. : जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर, जिल्हा सोलापूर.

ब. कार्यालय प्रमुख : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर.

क. कोणत्या खात्याच्या अंतर्गत हे कार्यालय आहे. : विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई—३२

ड. कामाचा अहवाल कोणत्या कार्यालयाकडे सादर केला जातो. : उच्च न्यायालय, मुंबई — ३२.

इ. सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय अंतर्गत असणारे सत्र विभाग, दिवाणी न्यायालये, व. स्तर व दिवाणी न्यायालये, क.स्तर यांची स्थानिक व तालुकानिहाय असलेली न्यायालये/कार्यालये यांची माहिती व त्यांच्या कार्यकक्षा :

अ) सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय(मुख्यालय):— आजमितीस सोलापूर स्थानिक मुख्यालयाच्या ठिकाणी खालील न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश. | १ |
| २ | जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | ५ |
| ३ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | १ |
| ४ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | ७ |
| ५ | मुख्य न्यायदंडाधिकारी | १ |
| ६ | सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १३ |
| ७ | अति. सह जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | ० |

सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील अपीलीय व सत्र विभागाच्या कामकाजाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र सोलापूर शहर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ या महसूली तालुक्यांकरिता आहे.

सोलापूर येथील दिवाणी न्यायालय, व. स्तर या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ या महसूली तालुक्यांकरिता आहे.

सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांचे न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर या महसूली तालुक्यांकरिता आहे.

## ब) <u>पंढरपूर सत्र विभाग</u>:—

पंढरपूर येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3288/1145/(131)-(i)-XVI, दिनांक ३१/८/१९८९ नुसार दिनांक १/१०/१९८९ पासून पंढरपूर, मंगळवेढा, व सांगोला या तालुक्याकरिता एक सत्र विभाग स्थापन करणेत आलेला आहे. पंढरपूर येथील अप्पर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र पंढरपूर, मंगळवेढा व सांगोला या महसूली तालुक्यापुरती मर्यादित आहे.

तसेच पंढरपूर येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3288/1145/(131)-(i)-XVI, दिनांक ३१/८/१९८९ नुसार दिनांक १/१०/१९८९ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली होती व सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र पंढरपूर, मंगळवेढा व सांगोला या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे आणि दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र पंढरपूर तालुका अशी आहे.

आजमितीस पंढरपूर येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | १ |
| २ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | ० |
| ३ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | ३ |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रेणी | ७ |
| ५ | अति. सह जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | १ |

## क) माळशिरस सत्र विभाग:—

माळशिरस येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3298/(340/98)-XI, दिनांक ०९/१२/२००४ नुसार दिनांक १८/१२/२००४ पासून माळशिरस या महसूली तालुक्याकरिता एक सत्र विभाग स्थापन झाला असून तेथील अपर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माळशिरस या महसूली तालुक्यापुरती मर्यादित आहे.

तसेच माळशिरस येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 3298/ (340/98)-XI, दिनांक ०९/१२/२००४ नुसार दिनांक १८/१२/२००४ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली असून सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माळशिरस या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे.

दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माळशिरस तालुका अशी आहे. माळशिरस येथे आजमितीस खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | २ |
| २ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | ० |
| ३ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | २ |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | ४ |

## ड) बार्शी विभाग:—

बार्शी येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक PaDaNi-0714/C.R.138/D-11, दि.२४.०९.२०१४ नुसार दि.२७.०९.२०१४ पासून सत्र विभाग स्थापन झाला असून तेथील अपर जिल्हा व सत्र न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र बार्शी, करमाळा आणि माढा या महसूली तालुक्यापुरती मर्यादित आहे.

बार्शी येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक CRC 2292/(413/98)-(I)-XI, दिनांक २२/०८/२००२ नुसार दि.२४/०८/२००२ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली असून सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र बार्शी या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे.

सह दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, बार्शी या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र बार्शी तालुका अशी आहे.

आजमितीस बार्शी येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | २ |
| २ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | ० |
| ३ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | २ |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | ४ |
| ५ | अति. सह जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश | १ |

## इ) करमाळा विभाग:—

करमाळा येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. न्यास्थाप १०१९/८२३/प्र.क्र.१७३/कार्यासन ११, दि. १९/०७/२०२२ नुसार दि. ०५/०२/२०२३ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली असून सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र करमाळा या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे.

सह दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, करमाळा या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र करमाळा तालुका अशी आहे.

आजमितीस करमाळा येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | १ |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | २ |

## फ) माढा विभाग:—

माढा येथे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : न्यायस्था—०१२०/०८/प्र.क्र.७/का—११, दिनांक १६/०१/२०२३ नुसार दि. २४/०६/२०२३ पासून दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, या न्यायालयाची स्थापना झालेली असून सदरहू न्यायालयाची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माढा या महसूली तालुक्यांपुरती मर्यादित आहे.

सह दिवाणी न्यायालय, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, माढा या न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र माढा तालुका अशी आहे.

आजमितीस माढा येथे खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | १ |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | ३ |

## ज) मोहोळ, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट, या तालुक्यांच्या ठिकाणी खालीलप्रमाणे न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | तालुक्याचे ठिकाण | न्यायालयाचे नांव | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मोहोळ | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| | | ३. २रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| २ | सांगोला | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| | | ३. २रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| ३ | मंगळवेढा | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |
| ४ | अक्कलकोट | १. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | १ |
| | | २. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी | १ |

वर नमूद केलेल्या सर्व न्यायालयांची कार्यकक्षा व न्यायिक अधिकार क्षेत्र त्या त्या तालुक्यांपुरती मर्यादित आहे.

फ. ध्येय/धोरण : कायद्यातील तरतुदीनुसार न्याय देणे.

ग. प्रत्यक्ष कार्य : दिवाणी व फौजदारी प्रकरणे तसेच मोटार अपघात प्रकरणात न्यायनिर्णय करणे. याशिवाय विधी सेवा प्राधिकरणामार्फत गरजू व गरीब पक्षकारास मोफत कायदेविषयक सल्ला व सहाय्य देणे.

ह. स्थावर मालमत्ता (येथे प्राधिकरणाची जमीन / इमारत आणि अन्य स्थावर मालमत्तेचातपशिल) :

# १) सोलापूर मुख्यालय

सोलापूर जिल्हयातील शहर सोलापूर येथे सिटी सर्व्हे नंबर ६१७८ च्या जागेमधील काही क्षेत्रात जिल्हा व सत्र न्यायालयाची इमारत असून, सदर इमारतीमध्ये न्यायालयीन कामकाज सन १९६० पासून सुरु आहे.

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे आवारामध्ये १) जिल्हा व सत्र न्यायालय (G+2), २) दिवाणी व फौजदारी न्यायालय (G+1), ३) तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय (G+1), ४) न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग दारुबंदी न्यायालय, ५) अभिलेख कार्यालय (G+1), ६) जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (G+1), ७) सोलापूर बार असोसिएशन व ग्रंथालय (G+1), ८) लॉयर्स चेंबर्स (G+1), ९) पूर्वीचे चतुर्थ श्रेणी / पहारेकरी यांचेकरीता असलेल्या एकूण ०४ निवासस्थानांमध्ये न्यायालयीन कामकाज चालविणेकामी तात्पुरत्या स्वरुपाचे ०२ न्यायालय प्रशाल निर्माण करण्यात आलेले आहेत. तसेच, आवारामध्ये लहान लहान बांधकामे असलेल्या काही इमारती असून, अपु—या जागेअभावी त्यांचा सुध्दा न्यायालयीन / कार्यालयीन कामकाजाकरीता वापर करण्यात येत आहे. वर नमुद प्रमाणे जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारामध्ये न्यायालयीन व कार्यालयीन कामकाज चालविणेकामी इमारती आहेत.

i) जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारामध्ये असलेल्या न्यायालयीन इमारतींमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायीक अधिकारी |
|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर. |
| २ | जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |

| अ .नं. | न्यायीक अधिकारी |
|---|---|
| ३ | जिल्हा न्यायाधीश—२ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |
| ४ | जिल्हा न्यायाधीश—३ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |
| ५ | जिल्हा न्यायाधीश—४ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |
| ६ | जिल्हा न्यायाधीश—५ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |
| ७ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |
| ८ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| ९ | मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर |
| १० | सदस्य—सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर |
| ११ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| १२ | २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| १३ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| १४ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| १५ | ५वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| १६ | ६वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| १७ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| १८ | २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| १९ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर (कोर्ट नंबर २) |
| २० | ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर |
| २१ | ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर (कोर्ट नंबर ३) |
| २२ | ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| २३ | ७वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर (दारुबंदी) |
| २४ | ८वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| २५ | ९वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| २६ | १०वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| २७ | ११वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |
| २८ | १२वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर |

ii) सोलापूर शहरात सिध्देश्वर पेठ परिसरामध्ये, रिपन हॉल चे लगतच्या बाजूस, सोलापूर महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (म्युनिसिपल), सोलापूर न्यायालयाचे कामकाज चालते.

iii) सोलापूर शहरामध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे अधिपत्याखाली, न्यायिक अधिका—यांसाठी अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थान (Assigned Govt. Residential Quarter) इमारती असून, तेथे खाली नमुद केल्याप्रमाणे न्यायीक अधिकारी वास्तव्यास आहेत.

| अ. नं. | अधिका—यांचा हुद्दा | निवासस्थानाचे नांव | न्यायीक अधिका—यांची संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर | कस्तुरी | १ | २२ सिव्हील लाईन्स, सोलापूर—४१३० ०१ |
| २ | जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश , सोलापूर | श्रध्दा | १ | सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर कार्यालयाचे लगतच्या बाजूस, कुमठा नाका, सोलापूर—४१३० ०३ |
| ३ | जिल्हा न्यायाधीश—२ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर | पूजा | १ | |
| ४ | जिल्हा न्यायाधीश—३ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर | भक्ती | १ | |
| ५ | न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, सोलापूर आणि जिल्हा न्यायाधीश—५ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर | मालकंस | १ | सिव्हील लाईन्स, ऑफिसर्स क्लब, सोलापूर चे मागील बाजूस, साधु वास्वानी उद्यान जवळ, सोलापूर—४१३० ०१ |
| ६ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर | मधुकंस | १ | |
| ७ | रिक्त | चंद्रकंस | १ | |
| ८ | ५वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर | रागेश्री—१ | १ | सिव्हील लाईन्स, ऑफिसर्स क्लब, |

| अ. नं. | अधिका—यांचा हुद्दा | निवासस्थानाचे नांव | न्यायीक अधिका—यांची संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| ९ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर | रागेश्री—२ | १ | सोलापूर चे मागील बाजूस, साधु वास्वानी उद्यान जवळ, सोलापूर—४१३० ०१ |
| १० | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर | रागेश्री—३ | २ | |
| ११ | रिक्त | रागेश्री—४ | १ | |
| १२ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर, सोलापूर | सुरश्री—१ | १ | सिव्हील लाईन्स, ऑफिसर्स क्लब, सोलापूर चे मागील बाजूस, साधु वास्वानी उद्यान जवळ, सोलापूर—४१३ ००१ |
| १३ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर, सोलापूर (कोर्ट नं.२) | सुरश्री—२ | १ | |
| १४ | तत्कालीन ४थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर सध्या, उप धर्मादाय आयुक्त, सोलापूर | सुरश्री—३ | १ | |
| १५ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर, सोलापूर (कोर्ट नं. ३) | सुरश्री—४ | १ | |
| १६ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर<br>व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर (म्युनसिपल) | सुरश्री—५ | १ | |
| १७ | १२वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर | सुरश्री—६ | १ | |
| १८ | ११वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर | बागेश्री—१ | १ | सिव्हील लाईन्स, ऑफिसर्स क्लब, सोलापूर चे |
| १९ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर | बागेश्री—२ | १ | |
| २० | ६वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर | बागेश्री—३ | १ | |

| अ. नं. | अधिका–यांचा हुद्या | निवासस्थानाचे नांव | न्यायीक अधिका–यांची संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| २१ | ९वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सोलापूर | बागेश्री–४ | १ | मागील बाजूस, साधु वास्वानी उद्यान जवळ, सोलापूर–४१३ ००१ |
| २२ | रिक्त | प्रसाद–१ | १ | सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर कार्यालयाचे लगतच्या बाजूस, कुमठा नाका, सोलापूर–४१३० ०३ |
| २३ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर | प्रसाद–२ | १ | |
| २४ | २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर | प्रसाद–३ | १ | |
| २५ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर | प्रसाद–४ | १ | |

iv) शहर सोलापूर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिपत्याखाली असलेल्या शासकीय निवासस्थानामध्ये खालील न्यायीक अधिकारी वास्तव्यास आहेत.

| अ. नं. | अधिका–यांचा हुद्या | निवासस्थानाचे नांव | संख्या | निवासस्थानाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| २६ | ७वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर (दारुबंदी)<br>आणि<br>न्यायाधीश, सहकार न्यायालय, सोलापूर | ममता क्यू १ | १ | सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिपत्याखालील शासकीय निवासस्थान "ममता", कुमठा नाका, सोलापूर–४१३००३ |

v) तसेच, खाली नमूद प्रमाणे न्यायीक अधिकारी हे शहर सोलापूर येथे खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

| अ. नं. | अधिका–यांचा हुद्दा |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश–४ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर |
| २ | मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर |

| अ. नं. | अधिका—यांचा हुद्दा |
|---|---|
| ३ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर |
| ४ | ६वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर |
| ५ | ८वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर |
| ६ | १०वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर |

## vi) जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर इमारतीवर कार्यान्वीत केलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाबाबत.

सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचेकडून ''सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत'' न्यायालयीन इमारतीवर पारेषण विरहित ऊर्जा निर्मीती विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पूर्व परवानगीने, मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर तसेच, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचेमार्फत जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर इमारतीवर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेला आहे.

## vii) जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारात प्रस्तावित ''अतिरिक्त जिल्हा न्यायालयाची इमारत (बेसमेंट + तळ मजला + ८ मजले ) (२५ कोर्ट हॉल) व स्काय वॉक'' बांधणेबाबत.

सद्य:स्थितीस, न्यायालयीन/कार्यालयीन कामकाजाकरीता अपु—या पडत असलेल्या न्यायालयीन इमारती तसेच, भेडसावत असलेल्या वाहनतळ समस्येचा विचार होवून, जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारात प्रस्तावित (Basement + Ground + 8 floors) बहुमजली अतिरीक्त न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात आलेले आराखडे तसेच, ढोबळ अंदाजपत्रकीय प्रस्ताव जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून मा.

उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर करण्यात आलेला होता. मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावास मा. इमारत समिती, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून संमती दर्शविण्यात येवून, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक B(W)6055 of 1989 (10)/691/9424, दिनांक १६ मार्च, २०२२ अन्वये मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई—३२ यांचेकडे शासनस्तरावर प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होवून मिळणेकामी अग्रेषित करण्यात आलेला होता.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीसीबी—१९२२/प्र.क्र.६२/का—१३, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ अन्वये, सोलापूर जिल्हयाच्या ठिकाणी अतिरिक्त जिल्हा न्यायालयाची इमारत (बेसमेंट + तळ मजला + ८ मजले ) (२५ कोर्ट हॉल) व स्काय वॉक बांधकामासाठी रुपये १०७=९५ कोटी (रु. एकशे सात कोटी पंच्याण्णव लक्ष फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास (शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विगतवारीनुसार) प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारामध्ये अतिरीक्त बहुमजली न्यायालयीन इमारत बांधणेकामी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, सोलापूर कार्यालयाकडून माहे मे, २०२४ मध्ये सुरुवात करण्यात आलेली असून, बांधकामाचे अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ २४५६४.८७ चौरस मीटर इतके आहे.

## २) तालुका — पंढरपूर

सोलापूर जिल्हयातील तालुका — पंढरपूर येथे सर्व्हे नंबर ४० मधील २ हेक्टर ३३ आर या जागेत, जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर कार्यालयाकडून करण्यात आलेले असून, नूतन जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर कार्यालयाकडून जिल्हा न्यायाधीश—१, पंढरपूर यांना दिनांक ०१/०८/२०१५ रोजी देण्यात आलेला आहे. नवीन न्यायालयीन इमारतीचा उदघाटन सोहळा दिनांक ०८/०८/२०१५ रोजी संपन्न

होवून, नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये पंढरपूर येथील न्यायालयीन व कार्यालयीन कामकाज सुरु आहे.

जिल्हा व सत्र न्यायालय, पंढरपूर इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश–१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, पंढरपूर |
| २ | अतिरीक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, पंढरपूर |
| ३ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ५ | २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ६ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ७ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ८ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ९ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| १० | ५वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ११ | ६वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| १२ | ७वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |

पंढरपूर येथे नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन कामकाज सुरु होण्यापूर्वी, पंढरपूर शहरातील सिटी सर्व्हे नंबर ११९१ या ठिकाणी असलेल्या न्यायालयाच्या जुन्या इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयांचे कामकाज चालविण्यात येत होते. पंढरपूर येथे दिनांक ०८/०८/२०१५ पासून नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन कामकाज सुरु झाल्यामुळे, जुनी न्यायालयीन इमारत सद्य:स्थितीस रिक्त आहे.

पंढरपूर, जिल्हा – सोलापूर येथे खालील न्यायीक अधिकारी अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश–१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, पंढरपूर |
| २ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ३ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ४ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पंढरपूर |

पंढरपूर येथे शासकीय निवासस्थान उपलब्ध नसल्यामुळे, खालील न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | अतिरीक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, पंढरपूर |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ३ | २रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर |
| ४ | २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ५ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ६ | ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ७ | ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |
| ८ | ७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पंढरपूर |

* महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक – सीसीबी–११२४/प्र.क्र.९३/का–१३, दिनांक ३० जानेवारी, २०२५ अन्वये पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉलच्या बांधकामासाठी रुपये १३४.७५ ( रुपये एक कोटी चौतीस लक्ष पंचाहत्तर हजार फक्त ) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. लॉयर्स हॉल बांधणेकामी पुढील उचित कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर कार्यालयाकडून योजण्यात येत आहे.

## ३) तालुका – माळशिरस

तालुका माळशिरस येथे गट नंबर २१०६/१अ/१ येथील न्यायालयाचे आवारामध्ये अ) सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ब) दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, क) जिल्हा न्यायाधीश व अति. सत्र न्यायाधीश या न्यायालयांचे कामकाज सुरु आहे.

माळशिरस येथील उपलब्ध न्यायालयीन इमारती या न्यायालयीन व कार्यालयीन कामकाजाकरीता अपु–या पडत असल्यामुळे, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर महसूल शाखा – कार्यासन क्र. ३ आदेश क्रमांक २०१४/महसूल/ कार्या–३/नभू–२/आरआर/६९८/एसआर/७९, दिनांक १०/९/२०१४ अन्वये नीरा उजवा कालवा यांची शासकीय मालकीची जमीन गट नंबर २१०६/१–अ/१ मधील ०१ हेक्टर इतके क्षेत्र, माळशिरस येथे नवीन न्यायालयीन इमारत तसेच, न्यायीक अधिकारी यांची अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने बांधणे या प्रयोजनासाठी दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ रोजी संपादित करण्यात आलेली आहे. सदर संपादीत केलेली जमीन सद्याचे न्यायालयाचे जागेलगत आहे.

i) माळशिरस, जिल्हा – सोलापूर येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याकरीता, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सादर करण्यात आलेल्या आराखडे व अंदाजपत्रकीय प्रस्तावास महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीसीबी–१११७/प्र.क्र.१५९/का–१३, दिनांक २० ऑगस्ट, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

तद्नंतर, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचेकडून करण्यात आलेल्या स्थळपाहणी दरम्यान, मौजे माळशिरस, तालुका माळशिरस येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणेकामी प्रस्तावित (Ground + 2 floors ) न्यायालयीन इमारतीचे वास्तुआराखडे व सुधारीत वास्तुमांडणी आराखडयामध्ये, भौगोलिक परिस्थितीनुसार निदर्शनास आलेल्या बाबी तसेच, "Child Friendly Court" ची तरतूद करणेकामी, काही अंतर्गत फेरबदल करुन, (Stilt/Ground + 3 floors ) चे सुधारीत आराखडे व सुधारीत वास्तुमांडणी आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयास सादर करण्यात आलेले होते. विषयांकीतकामी, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेले (Stilt/Ground + 3 floors ) चे सुधारीत आराखडे व सुधारीत वास्तुमांडणी आराखडे हे जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सादर करण्यात येवून, मा. इमारत समिती, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून (Stilt/Ground + 3 floors ) चे सुधारीत आराखडे व सुधारीत वास्तुमांडणी आराखडयास मान्यता दर्शविण्यात येवून, सुधारीत प्रस्तावास शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होवून मिळणेकामी मा. प्रबंधक (निरीक्षणे–२), उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई कार्यालयाकडून, मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांना अग्रेषित करण्यात आलेले होते.

माळशिरस, जिल्हा सोलापूर येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याकरीता महाराष्ट शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीसीबी–१११७/प्र.क्र.१५९/का–१३ दिनांक २० ऑगस्ट, २०१९ अन्वये देण्यात आलेल्या रुपये ३९.०७ कोटी खर्चाच्या अटीस अधीन राहून माळशिरस न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाच्या सुधारीत आराखडयास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ १२६११.६१ चौरस मीटर इतके आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज कार्यालयाकडून माळशिरस येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम माहे मे/जून, २०२२ पासून सुरु करण्यात आलेले असून, प्रगतीपथात आहे.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीसीबी–११२४/प्र.क्र.२४/का–१३, दिनांक २६ जून, २०२४ अन्वये माळशिरस, जिल्हा – सोलापूर येथे नवीन न्यायालय इमारतीसाठी फर्निचर पुरविण्याकरीता रुपये ११,२९,०५,०००/– इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. न्यायालय इमारतीसाठी फर्निचर उपलब्ध करुन देण्याची आवश्यक कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज कार्यालयाकडून योजण्यात येत असून प्रगतीपथात आहे.

सद्य:स्थितीस, माळशिरस येथील न्यायालयीन आवारामध्ये असलेल्या इमारतींमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश–१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, माळशिरस |
| २ | जिल्हा न्यायाधीश–२ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, माळशिरस |
| ३ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस |
| ४ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस |
| ५ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |
| ६ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |
| ७ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |
| ८ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |

माळशिरस येथील न्यायालयीन आवारामध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या पदाचे न्यायीक अधिकारी यांच्या वास्तव्याकरीता असलेली ०२ अभिहस्तांकित शासकिय निवासस्थाने ही नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करावयाच्या जागेमध्ये अडसर येत असल्याने, पाडण्यात आलेली आहेत.

सद्य:स्थितीस, जिल्हा न्यायाधीश तसेच, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता प्रत्येकी १ अशी एकूण ०२ अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने असून, सदर निवासस्थानांमध्ये जिल्हा न्यायाधीश–२ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, माळशिरस तसेच, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस वास्तव्यास आहेत.

माळशिरस येथे खाली नमूद केल्याप्रमाणे, न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश–१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, माळशिरस |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस |
| ३ | सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |
| ४ | २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |
| ५ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |
| ६ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस |

**ii)** माळशिरस, जिल्हा सोलापूर येथे बांधकाम प्रगतीपथात असलेल्या नवीन न्यायालयीन इमारतीचे आवारामध्ये न्यायीक अधिकारी यांचेकरीता (टाईप—४/टाईप—५/टाईप—६ ) ची एकूण १० न्यायाधीश निवासस्थाने बांधण्याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज कार्यालयाकडून सादर करण्यात आलेले आराखडे व अंदाजपत्रकीय प्रस्तावास, महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीआरक्यू—१२२३/प्र.क्र.२३५/का—१३, दिनांक ११ एप्रिल, २०२३ अन्वये रुपये ८,९०,८९,०९९/— (रुपये आठ कोटी नव्वद लक्ष एकोणनव्वद हजार नव्याण्णव फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास (शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विगतवारीनुसार) तसेच, त्यामध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज यांचा कार्यादेश क्रमांक सा.बां.वि.अ./निविदा/२८०२/सन २०२४, दिनांक २८ जून, २०२४ नुसार, न्यायीक अधिकारी यांचेकरीता जुन्या (टाईप—४/टाईप—५/टाईप—६ ) नुसार एकूण १० न्यायाधीश निवासस्थाने बांधण्याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज कार्यालयाकडून बांधकामाच्या कार्यवाहीस जूलै, २०२४ मध्ये सुरुवात करण्यात आलेली असून, बांधकाम प्रगतीपथात आहे.

## ४) तालुका — बार्शी

अ) बार्शी, जिल्हा — सोलापूर येथे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाचे न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाज चालविणेकरीता स्वतंत्र अशी इमारत आहे. न्यायालयीन इमारतीचे बांधकामाचे वर्ष — सन १८८३ असल्याचे कळून येते.

बार्शी येथे जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये करण्यात आलेली असून, जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी यांचे न्यायालयीन / कार्यालयीन कामकाजाकरीता स्वतंत्र इमारत उपलब्ध नसल्यामुळे, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचेकरीता असलेल्या ( बांधकामाचे वर्ष — सन १८८३ ) या जुन्या न्यायालयीन इमारतीमध्ये जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयीन/कार्यालयीन कामकाज सन २०१४ पासून चालविले जाते. सद्याची जुनी न्यायालयीन इमारत न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाज चालविणेकामी अपुरी पडत आहे.

ब) १४ वा वित्त आयोगांतर्गत सोलापूर जिल्हयातील तालुका बार्शी येथे अतिरीक्त / तात्पुरत्या न्यायालयाच्या कामकाजाकरीता बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे मालकीची इमारत छत्रपती संभाजीराजे शॉपिंग सेंटरमधील आरक्षण क्रमांक ४०, सि.स. नंबर ७०७, संकेश्वर उद्यानाचे दक्षिण बाजूस पहिल्या मजल्यावरील हॉल क्रमांक १ ते ७ ही इमारत माहे जानेवारी, २०१८ पासून भाडेतत्वावर घेण्यात आलेली होती. अतिरीक्त सह जिल्हा न्यायाधीश आणि अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी न्यायालयाचे कामकाज दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ कार्यालयीन वेळेनंतर बंद झाल्यामुळे, सदर इमारतीचा ताबा बार्शी नगरपरिषद, बार्शी यांना परत देण्याऐवजी, जुनी न्यायालयीन इमारत ही न्यायालयीन/कार्यालयीन कामकाजाकरीता अपुरी पडत असल्यामुळे, जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी न्यायालयाकरीता भाडेतत्वावर घेणे निकडीचे व आवश्यक झाले असल्यामुळे, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पूर्व परवानगीने वर नमुद वर्णन केलेली इमारत जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी यांचे न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता दिनांक २५ फेब्रुवारी, २०२३ पासून भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहे.

क) बार्शी येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयाची स्थापना दिनांक २४ ऑगस्ट, २००२ रोजी झालेली असून, सदर न्यायालयाच्या न्यायालयीन / कार्यालयीन कामकाजासाठी बार्शी येथील तालुका शेतकरी संघटनेची इमारत भाडेतत्वावर घेतलेली आहे. सदर इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयाचे न्यायालयीन / कार्यालयीन कामकाज सन २००२ पासून सुरु असून, सद्य:स्थितीस सदर इमारत न्यायालयीन / कार्यालयनी कामकाजाकरीता अपुरी पडत आहे.

i) सद्य:स्थितीत, बार्शी येथील जुन्या न्यायालयीन इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |
| २ | जिल्हा न्यायाधीश—२ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |
| ३ | अतिरीक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| ४ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बार्शी |
| ५ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बार्शी |
| ६ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |
| ७ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |
| ८ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |
| ९ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |

ii) बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे मालकीची इमारत छत्रपती संभाजीराजे शॉपिंग सेंटर इमारतीमधील पहिल्या मजल्यावर भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या इमारतीमध्ये खालील पदाचे न्यायालय कार्यरत आहे.

| | |
|---|---|
| १ | अतिरीक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |
| २ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |

ii) बार्शी येथील तालुका शेतकरी संघटनेच्या मालकीच्या भाडेतत्वावर घ
ेण्यात आलेल्या इमारतीमध्ये खालील पदाचे न्यायालय कार्यरत आहे.

| | |
|---|---|
| | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बार्शी |

सद्य:स्थितीस, बार्शी येथील जुनी न्यायालयीन इमारत तसेच, न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता वर नमुद ब) व क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या इमारती या न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता अपु—या पडत आहेत.

मौजे बार्शी, जिल्हा — सोलापूर येथील गायरान जमीन गट कमांक १०८८ (जुना गट कमांक १०८२ ) मध्ये एकूण क्षेत्रापैकी ४ हेक्टर ५२ आर ७६ चौरस मीटर इतकी जमीन ही न्यायालयीन खात्याच्या भविष्यकाळातील गरजा विचारात घेवून दिनांक २९ सप्टेंबर, १९९५ रोजी संपादीत करण्यात आलेली आहे.

बार्शी येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सादर करण्यात आलेला रुपये १,०६,४३,५६,०२६/— इतक्या रक्कमेचा अंदाजपत्रकीय प्रस्ताव, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे कमांक प्रशा.

/ड–१/२५६२/२०२०, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास सादर करण्यात येवून, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक B(W) 6043/1987(12)/03/08, दिनांक १ जानेवारी, २०२१ अन्वये मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई–३२ यांना शासनस्तरावर प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होवून मिळणेकामी अग्रेषित करण्यात आलेला होता.

बार्शी, जिल्हा सोलापूर येथे नवीन न्यायालयीन इमारत ( स्टील्ट + तळ मजला + ३ मजले ) (१५ कोर्ट हॉल) बांधकामासाठी रुपये ७६.१७ कोटी ( रुपये श्याहत्तर कोटी सतरा लक्ष फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीसीबी–१११९/प्र.क्र. १५/का–१३, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ अन्वये, शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विगतवारीनुसार) तसेच, त्यामध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

बार्शी, जिल्हा सोलापूर येथे नवीन न्यायालयीन इमारत ( स्टील्ट + तळ मजला + ३ मजले ) (१५ कोर्ट हॉल) बांधणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सादर करण्यात आलेल्या आराखडे व अंदाजपत्रकीय प्रस्तावामध्ये "Child Friendly Court" तसेच, Vulnerable Witness Deposition Center ची तरतूद अंतर्भूत नव्हती.

मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक B(W) No. 6014/2018/606/8079, दिनांक १ मार्च, २०१९ तसेच, पत्र क्रमांक B(W) 6006 of 2022 (Sum-257)/944/14140, दिनांक २५ एप्रिल, २०२२ वरील मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रशा. /ड–१/४१२२/२०२२, दिनांक १ सप्टेंबर, २०२२ अन्वये बार्शी येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकामाच्या सविस्तर प्रारुप आराखडे व ढोबळ वास्तुमांडणी आराखडयामध्ये "Child Friendly Court" तसेच, Vulnerable Witness Deposition Center ची तरतूद अंतर्भूत करुन, सुधारीत प्रारुप आराखडे व ढोबळ वास्तुमांडणी आराखडे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेकामी जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयास सादर करणेबाबतचा विनंतीपत्रव्यवहार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांना योजण्यात आलेला होता.

त्याअनुषंगाने, बार्शी येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणेकामी बनविण्यात आलेल्या आराखडयांमध्ये "Child Friendly Court" तसेच, Vulnerable Witness Deposition Center ची तरतूद अंतर्भूत करुन, मा. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, सा.बां.विभाग, मुंबई यांचेकडून बनविण्यात आलेले सुधारीत रेखा आराखडे (नकाशे) तसेच, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांच्या अहवालासह, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयामार्फत मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई—३२ यांना शासनस्तरावर सुधारीत आराखडयास मंजूरी व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी अग्रेषित करण्यात आलेले होते.

विधि सल्लागार—नि—सह सचिव, महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्रमांक सीसीबी—१११९/प्र.क्र.१५/का—१३, दिनांक २८ मार्च, २०२३ अन्वये बार्शी, जिल्हा सोलापूर येथे नवीन न्यायालयीन इमारत (स्टील्ट + तळ मजला + ३ मजले ) ( १६ कोर्ट हॉल ) बांधण्याकरीता शासन निर्णय, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ अन्वये देण्यात आलेल्या रुपये ७६.१७ कोटी खर्चाच्या अटीस अधीन राहून सदर बांधकामाच्या सुधारीत आराखडयास मान्यता देण्यात येत आहे असे नमूद केलेले आहे.

तद्नंतर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांचेकडून प्राप्त अहवालांमध्ये ''वस्तु व सेवा कर (जी.एस.टी.) मध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्प खर्चात वाढ होत असलेबाबत'' तसेच, इतर कारणांचा अहवालामध्ये उहापोह करुन, अंदाजपत्रकीय किंमतीत झालेल्या वाढीमुळे प्रशासकीय मान्यतेची रक्कम अपुरी पडत असल्याबाबत जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयास पत्रव्यवहाराद्वारे अवगत केले होते.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांचेकडून प्राप्त अहवाल पाहता, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून पत्रव्यवहारांद्वारे मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास मार्गदर्शन व पुढील निर्देश कळविणेकामी विनंती पत्रव्यवहार योजलेला होता.

मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाकडील दिनांक २४ जून, २०२४ अन्वये प्राप्त सुचना पाहता, मंजूर सुधारित आराखडा आणि प्रशासकीय मान्यतेमध्ये मंजूर केलेल्या रक्कमेप्रमाणे नवीन न्यायालय इमारतीच्या बांधकामास सुरुवात करावी आणि सदर न्यायालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाधी सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन शासनस्तरावरुन मान्यता प्राप्त करुन घेणेकामी उचित कार्यवाही योजणेकरीता सादर

करावा असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयास कळविलेले आहे. पुढील उचित कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.

कार्यकारी अभियंता,कसार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयाचा आदेश क्रमांक लेखा/निविदा/४१३४/२०२४, दिनांक २४ जून, २०२४ अन्वये कार्यादेश पारीत होवून, बार्शी येथे नवीन न्यायालयीन इमारतीच्या बांधकामास माहे जूलै, २०२४ मध्ये सुरुवात करण्यात आलेली आहे. प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ १९६२६.७३ चौरस मीटर इतके आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरीता अंदाजपत्रकीय प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता,कसार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयाकडून प्रलंबित आहे.

बार्शी, जिल्हा – सोलापूर येथे ०२ अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने असून, खालील न्यायीक अधिकारी अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |
| २ | ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |

बार्शी येथे खालील न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थानात भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश—१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |
| २ | जिल्हा न्यायाधीश—२ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |
| ३ | अतिरीक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बार्शी |
| ४ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बार्शी |
| ५ | सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बार्शी |
| ६ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |
| ७ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी |

बार्शी, जिल्हा सोलापूर येथे जिल्हा न्यायाधीश यांचेकरीता — ३, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचकरीता — २ आणि दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांचेकरीता — २ अशी एकूण ७ निवासस्थाने बांधण्याकरीता, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयाकडून सादर करण्यात

आलेल्या आराखडे व अंदाजपत्रकीय प्रस्तावास, महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीआरक्यू—१२२२/प्र.क्र.१५५/का—१३, दिनांक १४ डिसेंबर, २०२२ अन्वये रक्कम रुपये ५,५४,७६,३२१/— ( रुपये पाच कोटी चोपन्न लक्ष शहात्तर हजार तीनशे एकवीस फक्त ) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास, शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विगतवारीनुसार तसेच, त्यामध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर पत्र क्र. एसओएल/पीडब्लयूसी/प्रकल्प—३/७०३/२०२४, दि. ६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांना कळविलेले निर्देश पाहता, बार्शी, जिल्हा सोलापूर येथे जिल्हा न्यायाधीश यांचेकरीता — ३, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचेकरीता — २ आणि दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचेकरीता — २ अशी एकूण ७ निवासस्थाने बांधण्याकरीता रुपये ५५४.७६ लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु, सदर सर्व निवासस्थानांची बांधकामे पूर्ण करणेकरीता सदरची रक्कम कमी पडत असल्याने सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयामार्फत सुरु करावी असे निर्देशीत केलेले होते.

तसेच, मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व मा. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या उपस्थितीत दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ रोजी V.C. द्वारे झालेल्या बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार संदर्भाधीन प्रशासकीय मान्यता रक्कमेमध्ये समाविष्ट निवासस्थानांपैकी ज्या ज्या निवासस्थानांच्या इमारतींचे बांधकाम रुपये ५५४.७६ लक्ष इतक्या रक्कमेत पूर्ण करणे शक्य आहे त्या त्या निवासस्थानांच्या इमारतींचा समावेश करुन तांत्रिक मान्यतेच्या अंदाजपत्रकांसह प्रस्ताव जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडे मान्यतेस्तव सादर करावा. तसेच, उर्वरीत न्यायाधीश निवासस्थानांच्या इमारतींच्या बांधकामाचे नवीन प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करुन, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करावे असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांना अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर

यांचेकडून निर्देशीत करण्यात येवून, सदर पत्राची एक प्रत जिल्हा न्यायालय, सोलापूर यांना अग्रेषित करण्यात आलेली होती.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त पत्रव्यवहार पाहता, त्याबाबत जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास पत्रव्यवहाराद्वारे अवगत करुन, मार्गदर्शन व पुढील निर्देश कळविणेकामी विनंती करण्यात आलेली होती.

त्याअनुषंगाने, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाकडून दिनांक २१ सप्टेंबर, २०२४ अन्वये प्राप्त सुचना पाहता तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र कमांक B(W) 6042 of 2010 (229)SS/2009/45282, दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ अन्वये जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तसेच, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या पदाच्या न्यायीक अधिकारी यांचे अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थानाचे सुधारीत प्रमापाचे आराखडे व मार्गदर्शक सुचना विचारात घेता, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र कमांक Adm./D-1/7912/2024, दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ अन्वये जिल्हा न्यायाधीश या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता ४, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता ४ आणि दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता ८ अशी एकूण १६ प्रस्तावित अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने बांधणेकामी, सुधारीत प्रमापाचे आराखडे व मार्गदर्शक सुचना विचारात घेवून, मा. उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचेकडून सुधारीत आराखडे बनवून घेवून, सुधारीत आराखडयांसह अंदाजपत्रकीय प्रस्ताव सादर करणेबाबतचा पत्रव्यवहार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर तसेच, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कमांक २, सोलापूर कार्यालयास करण्यात आलेला होता.

बार्शी, जिल्हा – सोलापूर येथे न्यायीक अधिकारी यांचेकरीता अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने बांधणेकामी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कमांक २, सोलापूर कार्यालयाकडून सादर करण्यात आलेले सुधारीत आराखडे व रक्कम रुपये ४०,९७,८४,७३०/– इतक्या रक्कमेचा सुधारीत अंदाजपत्रकीय प्रस्ताव, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र कमांक प्रशा. /ड–१/१९९५/२०२५, दिनांक १६ जून, २०२५ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास अवलोकनार्थ व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

## ५)　　तालुका — सांगोला

मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा आदेश क्रमांक मशा.कार्या.३.३क.आनों. ३०४, दिनांक २ जून, १९९५ अन्वये न्यायालयीन इमारत व कर्मचारी निवासस्थान बांधणेकरीता सांगोला येथील आरक्षण क. ४३/अ, क्षेत्र हे १—४३ आर (नगर भूमापन क्रमांक ३०८४/२) व गावठाणातील आरक्षण क. ४४, क्षेत्र हे. ०—४७ आर. ( नगर भूमापन क्रमांक २१८१ ) असे एकूण हे १—९३ आर क्षेत्र न्याय खात्याकडे हस्तांतरीत केले असून, सदर जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात येवून, सदर इमारतीमध्ये दिनांक १९/११/२००९ पासून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाच्या न्यायालयांचे कामकाज चालू आहे. सदर न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन कामकाज चालविणेकामी मूळ ०२ न्यायालय प्रशाल असून, लहान खोल्यांमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचे आणखीन ०२ न्यायालय प्रशाल बनविण्यात आलेले आहेत. सांगोला येथील न्यायालयीन इमारत न्यायालयीन तसेच, प्रशासकीय कामकाजाकरीता अपुरी पडत आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचना विचारात घेवून, न्यायालय आवारामध्ये बहुमजली न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणेकामी मा. उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाकडून आराखडे बनविण्याचे काम प्रगतीपथात आहे.

सांगोला येथील न्यायालयीन इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला |
| ३ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला |

सांगोला येथील न.भू.क्र. २१८१ मधील क्षेत्र ०=४७ आर या जागेमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता एकूण ०४ अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने आहेत. सदर अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये खालील न्यायीक अधिकारी वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला |
| ३ | २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला |
| ४ | सद्य:स्थितीस एक अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थान रिक्त |

* महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक – सीसीबी–११२४/प्र.क्र.९३/का–१३, दिनांक ३० जानेवारी, २०२५ अन्वये सांगोला, जिल्हा सोलापूर येथील तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉलच्या बांधकामासाठी रुपये १३७.२३ ( रुपये एक कोटी सदतीस लक्ष तेवीस हजार फक्त ) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. लॉयर्स हॉल बांधणेकामी पुढील उचित कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर कार्यालयाकडून योजण्यात येत आहे.

## ६) तालुका – मोहोळ

अ) मोहोळ येथील गट नंबर ११३६ पैकी काही क्षेत्रामध्ये न्यायालयीन इमारत तसेच, न्यायीक अधिकारी यांची अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने आहेत. मोहोळ न्यायालयीन इमारत करीता एकूण ० हे ३५ आर आणि न्यायीक अधिकारी यांची अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थान करीता एकूण ० हे १८ आर क्षेत्रफळ आहे.

संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ चे चौपदरीकरण करणेकामी, मौजे मोहोळ, ता. मोहोळ येथील गट नं. ११३६ पैकी, न्यायालय इमारतीचे बाधित होणारे क्षेत्र एकूण ११ आर. ( कंपाऊंडमधील ० हे. ०५ आर व कंपाऊंडबाहेरील ० हे. ०६ आर ) तसेच, न्यायाधीश निवासस्थानाचे बाधित होणारे क्षेत्र ०६ आर (कंपाऊंडमधील ० हे. ३.५० आर व कंपाऊंडबाहेरील ० हे. २.५० आर) साठी भूसंपादन करण्याची कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

मोहोळ येथील न्यायालयीन इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोहोळ |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोहोळ |
| ३ | २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोहोळ |

मोहोळ न्यायालयाची इमारत न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता अपुरी पडत असल्यामुळे, नवीन न्यायालयीन इमारत बांधणेकामी प्रारुप विकास योजना – मोहोळ नगर परिषद, जिल्हा – सोलापूर मध्ये शासकीय विभागासाठी जागा आरक्षीत करणेकामी सहायक संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, सोलापूर यांना पत्रव्यवहार योजण्यात आलेला आहे.

ब) मोहोळ येथे न्यायीक अधिकारी यांचेकरीता एकूण ०३ अभिहस्तांकित शासकीय निवासस्थाने आहेत.

मोहोळ जिल्हा – सोलापूर येथे खालील न्यायीक अधिकारी अभिहस्तांकित शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोहोळ |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोहोळ |
| ३ | २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोहोळ |

## ७) तालुका – मंगळवेढा

अ) मंगळवेढा येथील भूखंड सि.स.नंबर २७१ पैकी आरक्षण नंबर ५४ चे क्षेत्र ० हे. ८६ आर, ४७० चौ.मीटर या जागेचा कब्जा दिनांक १६/१०/१९९५ रोजी न्याय खात्यास मिळाला आहे. सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात येवून, नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ पासून न्यायालयाचे कामकाज सुरु झालेले आहे.

जुनी न्यायालयीन इमारत ही सि.स.नंबर २२, त्याचे क्षेत्र २१६०=७ चौ. मी. या जागेमध्ये असून, नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन/कार्यालयीन कामकाज सुरु असल्यामुळे, जुनी न्यायालयीन इमारत सद्य:स्थितीस रिक्त आहे.

नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगळवेढा |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगळवेढा |

ब)        मंगळवेढा येथे भूखंड सि.स.नंबर ३१/६ मधील ० हे २० आर, ८० चौ. मीटर या जागेमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या पदाची एकूण ०३ अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने आहेत.    त्यामध्ये खालील न्यायीक अधिकारी वास्तव्यास आहेत.

| | |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगळवेढा |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगळवेढा |
| ३ | सद्य:स्थितीस एक अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थान रिक्त |

*        महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक – सीसीबी–११२४/प्र.क्र.९३/का–१३, दिनांक ३० जानेवारी, २०२५ अन्वये मंगळवेढा, जिल्हा सोलापूर येथील तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉलच्या बांधकामासाठी रुपये १३५.९९ ( रुपये एक कोटी पस्तीस लक्ष नव्याण्णव हजार फक्त ) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. लॉयर्स हॉल बांधणेकामी पुढील उचित कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर कार्यालयाकडून योजण्यात येत आहे.

## ८)    तालुका – माढा

अ)        माढा, जिल्हा – सोलापूर येथे गट नं. ३६०, नगर भूमापन क्रमांक २०८६ या न्यायालयाचे जागेमध्ये दिवाणी व फौजदारी न्यायालयीन जुनी इमारत तसेच, नगर भूमापन क्रमांक २०८५ या जागेत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाकरीता अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थानाची इमारत आहे.

मौजे माढा येथील जुन्या न्यायालयीन इमारतीचे आवारालगतच्या बाजूस, गट नंबर ३५९/१/अ/२, क्षेत्र २ हे. ०० आर. या न्यायखात्याच्या जागेत सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, सोलापूर कार्यालयाकडून नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले असून, माढा येथील नवीन न्यायालयीन इमारतीचा उद्घाटन सोहळा दिनांक २५ फेब्रुवारी, २०१७ रोजी संपन्न होवून, सदर नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन/कार्यालयीन कामकाज सुरु आहे.

सोलापूर जिल्हयातील तालुका माढा येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ

स्तर, माढा या पदाच्या न्यायालयाची स्थापना दिनांक २४ जून, २०२३ रोजी करण्यात आलेली असून, जुन्या न्यायालयीन इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माढा यांचे न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाज सुरु आहे. तसेच, नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाच्या न्यायालयांचे तसेच, कार्यालयीन कामकाज सुरु आहे.

माढा येथे खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माढा |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माढा |
| ३ | २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माढा |
| ४ | ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माढा |

ब) माढा येथे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तसेच, २रे सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर हे अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थानामध्ये वास्तव्यास आहेत.

माढा येथे शासकीय निवासस्थान उपलब्ध नसल्यामुळे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माढा तसेच, ३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, माढा हे खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

क) सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर यांचेकडून सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय प्रस्तावास, महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई .शासन निर्णय क्रमांक सीआरक्यू–१२२२/प्र.क्र.१३०/का–१३, दिनांक १४ डिसेंबर, २०२२ अन्वये माढा, जिल्हा सोलापूर येथे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाकरीता एकूण ०२ निवासस्थानांचे बांधकाम करण्याकरीता रुपये १,३२,४९,२२१/– (रुपये एक कोटी बत्तीस लक्ष एकोणपन्नास हजार दोनशे एकवीस फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास (शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विगतवारीनुसार) प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयाचा कार्यारंभ आदेश क्रमांक लेखा/निविदा/३१९७/सन २०२३, दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ अन्वये सहाय्यक अभियंता श्रेणी–१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कुर्डूवाडी यांचे देखरेखीखाली बांधकाम करण्यात आलेले आहे. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे / अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, बांधण्यात आलेली नवीन अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने ताब्यात घेण्याची पुढील उचित कार्यवाही योजण्यात येईल.

* महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक – सीसीबी–११२४/प्र.क्र.९३/का–१३, दिनांक ३० जानेवारी, २०२५ अन्वये माढा, जिल्हा सोलापूर येथील तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉलच्या बांधकामासाठी रुपये १४१.४६ ( रुपये एक कोटी एकेचाळीस लक्ष सेहचाळीस हजार फक्त ) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. लॉयर्स हॉल बांधणेकामी पुढील उचित कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, सोलापूर कार्यालयाकडून योजण्यात येत आहे.

९) तालुका – करमाळा

अ) करमाळा, जिल्हा – सोलापूर येथे गट क्रमांक २३६, सर्व्हे नंबर ३९२२ मधील १ हेक्टर १६ आर इतक्या क्षेत्रामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यात आलेली असून, सदर इमारतीमध्ये सन २००९ पासून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाच्या न्यायालयांचे न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाज सुरु आहे.

सोलापूर जिल्हयातील तालुका करमाळा येथे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी नव्याने दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या पदाच्या न्यायालयाची स्थापना करण्यात आलेली असून, सध्याचे करमाळा न्यायालयीन इमारतीमध्ये उपलब्ध न्यायालय प्रशाल तसेच, खोल्यांमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तसेच, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाच्या

न्यायालयांचे कामकाज तसेच, सदर न्यायालयांच्या आस्थापनेवरील विवीध विभागांचे कार्यालयीन तसेच, प्रशसकीय कामकाज सुरु आहे. सध्याची न्यायालयीन इमारत न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता अपुरी पडत आहे.

करमाळा न्यायालयीन इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, करमाळा |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, करमाळा |
| ३ | २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, करमाळा |

न्यायालयीन तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता करमाळा येथील सध्याची न्यायालयीन इमारत अपुरी पडत असल्यामुळे, करमाळा येथे न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणेकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास मार्गदर्शन व पुढील निर्देश कळविणेकामी जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाकडून पत्रव्यवहार योजण्यात आलेला होता.

मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक B(W) 6042 of 1971 (4)/878/19879, दिनांक १५ एप्रिल, २०२४ अन्वये प्राप्त निर्देश पाहता, करमाळा येथे न्यायालयीन कामकाजाकरीता येणा—या व्यक्तींना आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्याचे अनुषंगाने, न्यायालयीन आवारामध्ये उपलब्ध असलेल्या खुल्या जागेत अतिरीक्त बहुमजली न्यायालयीन इमारतीचे बांधकाम तसेच, वाहनतळाचे प्रयोजन करणेकामी मा. उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाकडून सविस्तर आराखडे तयार करुन घेणेबाबतचा पत्रव्यवहार जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रशा. /ड—१/१३९७/२०२४, दिनांक २ मे, २०२४ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज कार्यालयास योजण्यात आलेला आहे.

तालुका न्यायालयाचे ठिकाणी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणेकामी, मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाकडील मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने, करमाळा न्यायालयाचे ठिकाणी न्यायालयीन कामकाज चालविणेकामी आवश्यक असलेल्या गरजा व सुविधांचा विचार होऊन, प्रस्तावित

Basement/Stilt चे ठिकाणी वाहनतळ तसेच, Ground + 4 मजल्याचे प्रयोजन करणे आवश्यक आहे. मा. उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करमाळा न्यायालयीन आवाराची स्थळपाहणी करीत असताना (Basement/Stilt + Ground + 4 Floors) ही प्रस्तावित न्यायालयीन इमारत बांधणेकामी न्यायालयीन आवारामध्ये काही प्रमाणात उपलब्ध असलेल्या जागेचा विचार करता, प्रशस्त व सुसज्ज अशी प्रस्तावित न्यायालयीन इमारत बांधणे सोईस्कर होणार नाही असे कळवून, करमाळा न्यायालय आवाराचे लगतच्या बाजूस महसूल विभागाची मोठया प्रमाणात उपलब्ध असलेल्या मोकळया जागेपैकी न्याय खात्यास जागा उपलब्ध झाल्यास, प्रस्तावित न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे सोईस्कर होईल असे मत कळविलेले आहे.

क) सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, करमाळा यांचेकडून जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयास अहवाल सादर करुन, नगर भूमापन क्रमांक ३९२२ या न्यायखात्याचे जागेलगत, महसूल विभागाची नगर भूमापन क्रमांक ३९२६ मोठया प्रमाणात जागा आहे. सदर जागा ही पडीक अवस्थेत असून, तेथे काटेरी झाडे—झुडपे वाढलेली आहेत. सदर जागा उपलब्ध झाल्यास, बहुमजली न्यायालयीन इमारतीचे बांधकाम व वाहनतळाकरीता जागा उपलब्ध होवू शकेल व न्यायालयासाठी आवश्यक असलेली जागेची निकड भागेल असे मत कळविलेले आहे.

यायालयीन/कार्यालयीन कामकाज चालवित असताना सध्याचे न्यायालयीन इमारतीमध्ये अपु—या पडत असलेल्या खोल्या तसेच, न्यायालयीन आवारामध्ये अल्प प्रमाणात उपलब्ध असलेल्या मोकळया जागेचा विचार करता, उपलब्ध जागेत प्रस्तावित अतिरीक्त बहुमजली न्यायालयीन इमारत बांधणेकामी आराखडे बनवित असताना, अपु—या जागेमुळे सध्याच्या व भविष्यातील गरजा समाविष्ट होवू शकत नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, करमाळा यांचेकडून सादर करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन होवून, न्यायालय आवारालगत नगर भूमापन क्रमांक ३९२६ मधील शासकीय जागा न्यायखात्यास तातडीने वर्ग होवून मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी,

सोलापूर यांना जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रशा. /ड–५/४१२/२०२५, दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ अन्वये पत्रव्यवहार योजण्यात आलेला आहे.

ब) करमाळा येथे नगर भूमापन क्रमांक ३९२७, क्षेत्र १५०० चौ.मीटर या जागेमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाचे एक जुने अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थान आहे. सद्य:स्थितीस, सदर निवासस्थान रिक्त आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज यांना पत्रव्यवहार योजण्यात येवून, जुन्या अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थानाचे स्ट्रक्चरल ऑडीट व अनुषंगिक बाबींचा विचार होवून, सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत सुचित केलेले आहे.

क) करमाळा न्यायालयाचे आवारामध्ये, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता एकूण ०२ अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आलेली असून, सदर निवासस्थानांचा ताबा दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजी मिळालेला आहे. सदर निवासस्थानांमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, करमाळा तसेच, २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, करमाळा हे न्यायीक अधिकारी वास्तव्यास आहेत. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या पदावर कार्यरत न्यायीक अधिकारी खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

१०) तालुका – अक्कलकोट

अ) अक्कलकोट, जिल्हा – सोलापूर येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाची ब्रिटीशकालीन जुनी इमारत आहे. सदर इमारत न्यायालयीन / कार्यालयीन कामकाजाकरीता अपुरी पडत आहे.

अक्कलकोट येथील जुन्या न्यायालयीन इमारतीमध्ये खालील पदाची न्यायालये कार्यरत आहेत.

| अ.नं. | न्यायालयाचे नांव |
|---|---|
| १ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अक्कलकोट |
| २ | सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अक्कलकोट |

अक्कलकोट येथे प्रस्तावित न्यायालयीन इमारत व न्यायीक अधिकारी यांचेकरीता अभिहस्तांकीत शासकीय निवासस्थाने बांधणेकामी मा. जिल्हाधिकारी, सोलापूर आदेश क्रमांक २०१६.मशा/कार्या–३/३–क/प्र.क्र.६१/१६/एसआर/ १४४, दिनांक ८ मार्च, २०१९ (महसूल शाखा कार्यासन क. ३) अन्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर यांचे प्रतिनीधी या अधिकारात दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अक्कलकोट यांना मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अधिपत्याखालील अक्कलकोट तहसिल कार्यालयाचे प्रतिनीधी–मंडळ अधिकारी, अक्कलकोट यांचेकडून गट नंबर ७०८ मधील एकुण क्षेत्र ०२ हे १५ आर भूखंडाचा ताबा दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी देण्यात आलेला आहे.

मौजे अक्कलकोट, जिल्हा – सोलापूर येथे प्रस्तावित (Basement+Ground+3 Floors) नवीन न्यायालयीन इमारत बांधणेकामी उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे कार्यालयाकडून तयार करण्यात आलेल्या आराखडयांमध्ये पुन:श्च, अधिकच्या चौथ्या मजल्यावर एकूण तीन विश्रामगृह/अतिथीगृह बांधणे या प्रस्तावित बांधकामाचा विचार होवून बनविण्यात आलेल्या सुधारीत प्रारुप रेखा आराखडे व ढोबळ वास्तुमांडणी आराखडयास मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाकडून मान्यता कळविण्यात आलेली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक B(W) 6036 of 2017 (38)/1852/41712, दिनांक २० ऑगस्ट, २०२४ अन्वये प्राप्त निर्देशांचे अनुषंगाने, जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक Adm./D-5/ 6873/2024, दिनांक २० ऑगस्ट, २०२४ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर तसेच, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अक्कलकोट कार्यालयास पत्रव्यवहार योजण्यात येवून, सुधारीत अंदाजपत्रकीय प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित केलेले होते.

सोलापूर जिल्हयातील मौजे अक्कलकोट, तालुका अक्कलकोट येथे नवीन न्यायालयीन इमारत (Basement + Ground + 4 Floors) बांधणेकामी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी सादर केलेले सुधारीत आराखडे व रक्कम रुपये ८०,३०,८७,१०७/– ( अक्षरी रुपये ऐंशी कोटी तीस लाख सत्याऐंशी हजार एकशे सात फक्त ) इतक्या रक्कमेचा सुधारीत अंदाजपत्रकीय प्रस्ताव हा जिल्हा न्यायालय, सोलापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रशा./ड–१/५२१७/२०२४, दिनांक १० डिसेंबर, २०२४ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयास सादर करण्यात आलेला होता.

सदरहू सुधारीत अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक B(W) 6036 of 2017/(38)/87/1741, दिनांक १३ जानेवारी, २०२५ अन्वये महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुधारीत आराखडे व सुधारीत अंदाजत्रकीय प्रस्तावास शासनस्तरावरुन प्रशासकीय मान्यतेकामी पुढील उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित करण्यात आलेला आहे.

ब) सद्य:स्थितीस, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अक्कलकोट तसेच, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अक्कलकोट या पदावर कार्यरत न्यायीक अधिकारी हे अक्कलकोट येथे खाजगी निवासस्थान भाडेतत्वावर घेवून वास्तव्यास आहेत.

अक्कलकोट येथे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता ०२ शासकीय निवासस्थाने बांधणेकामी रुपये २,७२,८७,०००/– ( रुपये दोन कोटी बहात्तर लक्ष सत्याऐशी हजार फक्त ) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीआरक्यू–१२२४/प्र.क्र.९७/का–१३, दिनांक ७ मार्च, २०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

अक्कलकोट येथे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदाचे न्यायीक अधिकारी यांचेकरीता ०२ शासकीय निवासस्थाने बांधणेकामी पुढील उचित कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर कार्यालयाकडून सुरु आहे.

| | | |
|---|---|---|
| ई. कार्यालयाची वेळ व दूरध्वनी क्र./पत्ता/ई मेल | : | १. न्यायिक अधिकारी व कर्मचा—यांकरिता कार्यालयाची वेळ :— सकाळी १०.३० ते सायं ६.०० वाजेपावेतो.<br>२. दूरध्वनी क्रमांक ०२१७—२६२७०७७<br>३. ई मेल पत्ता :—mahshodc@mhstate.nic.in |
| ज. सप्ताहीक सुट्टी | : | रविवार तसेच प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार या दिवशी कार्यालयास सुट्टी असते. तथापि सदर सुट्ट्यात लोकन्यायालये, शिबिरे व न्यायिक अधिकारी यांची कार्यशाळा असे कार्यक्रम राबविले जातात. |

बाब क्रमांक २ : अधिका—यांचे व कर्मचा—यांचे अधिकार व कर्तव्ये.

| | | |
|---|---|---|
| १ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश | : | १. जिल्हा न्यायालयांतर्गत तालुका, जिल्हा स्तरावर कार्यरत न्यायालयांचे कामकाजावर देखरेख करणेबाबत प्रशासनीक अधिकार.<br>२. एक कोटी पर्यन्तची आर्थिक मूल्य मर्यादा असलेल्या प्रकरणामधील दिवाणी न्यायाधीश क. स्तर व दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांनी दिलेल्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याच्या विरूध्दची अपीलाची प्रकरणेसुनावणी अंती न्यायनिर्णय देवून निकाली काढणे.<br>३. न्यायदंडाधिकारी यांचेकडून वर्ग होवून आलेल्या सत्र खटल्यात पुराव्याअंती न्यायनिर्णय देणे.<br>४. मोटार अपघात दावे न्यायाधिकरणाचे अध्यक्ष /पदसिध्द सदस्य म्हणून पहाणे तसेच दाखल झालेल्या मोटार अपघात नुकसान भरपाईच्या प्रकरणांचा सुनावणी अंती न्यायनिर्णय करणे |

५. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण म्हणून मोफत कायदेविषयक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे, त्याकरिता शिबीरांचे योजन करणे तसेच दुर्बल घटकातील व्यक्तींना कायदेविषयक प्रकरणात मोफत अधिवक्त्याच्या सेवा उपलब्ध करून देणे.

६. लवाद व समेट अधिनियम (Arbitration & Conciliation Act) चे प्रकरणात न्यायनिर्णय देणे, गार्डीयन ॲन्ड वॉर्डस ॲक्टखालील प्रकरणात न्यायनिर्णय देणे.

७. मानवी हक्क अधिनियम या कायद्यांतर्गत दाखल झालेल्या प्रकरणात न्यायनिर्णय देणे

८. दखलपात्र व अदखलपात्र गुन्हयातील प्रकरणामध्ये न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांनी न्यायनिर्णय करून निर्दोष घोषित करणेत आलेल्या आरोपीविरूध्दची सरकार पक्षाचे वतीने दाखल करणेत आलेली अपील चालविणे व त्यामध्ये सुनावणीअंती न्यायनिर्णय देणे.

२. जिल्हा न्यायाधीश — १/२/३/४/५

: १. न्यायदंडाधिकारी यांचेकडून वर्ग होवून व अति. सत्र न्यायाधीश, सत्र आलेल्या खटल्यात पुराव्या अंती न्यायनिर्णय देणे.

२. न्यायदंडाधिकारीयांनी दिलेल्याशिक्षेबाबत व इतर न्यायनिर्णयावरील अपीले, पुर्नविलोकन अर्ज निकालात काढणे.

३. एक कोटी पर्यन्तची आर्थिक मूल्य मर्यादा असलेल्या प्रकरणामधील दिवाणी न्यायाधीश क. स्तर व दिवाणी न्यायाधीश व स्तर यांनी दिलेल्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याच्या विरूध्दची अपीलाची प्रकरणे सुनावणीअंती न्यायनिर्णय देवून निकाली काढणे.

४. गार्डीयन ॲन्ड वॉर्डस ॲक्टखालील आणि मोटार अपघात नुकसान भरपाईच्या दाखल प्रकरणांचा सुनावणीअंती न्यायनिर्णय करून प्रकरणे निकाली करणे.

५. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८, विद्य ुत अधिनियम, २००३, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९,एन.डी.पी.एस. अधिनियम, महिलावरील अत्याचार व अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधक अधिनियम इ.अधिनियमानुसार दाखल झालेल्या खटल्यांची "विशेष न्यायाधीश" म्हणून अधिनियमांतर्गत सुनावणी ऐकून घेवून न्यायनिर्णय देवून खटले निकाली काढणे.

६. दखलपात्र व अदखलपात्र गुन्हयातील प्रकरणामध्ये न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी यांनी न्यायनिर्णय करूननिर्दोष घोषित करणेत आलेल्या आरोपी विरूध्दची सरकार पक्षाचे वतीने दाखल करणेत आलेली अपील चालविणे व त्यामध्ये सुनावणीअंती न्यायनिर्णय देणे.

३. तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१ :

१. न्यायदंडाधिकारी यांचेकडून वर्ग होवून अति. सत्र न्यायाधीश, आलेल्या खटल्यात पुराव्याअंती न्यायनिर्णय देणे.

२. न्यायदंडाधिकारी यांनी दिलेल्या शिक्षेबाबत व इतर न्यायनिर्णयाचे अपीले, पुर्नविलोकन अर्ज इ. प्रकरणे निकालात काढणे.

३. एक कोटी पर्यन्तची आर्थिक मूल्य मर्यादा असलेल्या प्रकरणामधील दिवाणी न्यायाधीश क.स्तर व दिवाणी न्यायाधीश, व.स्तर यांनी दिलेल्या न्यायनिर्णय व हुकूमनाम्याच्या विरूध्दची अपीलाची प्रकरणेसुनावणीअंती न्यायनिर्णय देवून निकाली काढणे.

४. एन.डी.पी.एस. अधिनियम, महिलांवरील अत्याचार व अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधक अधिनियमानुसार तसेच गार्डीयन ॲन्ड वॉर्डस ॲक्टखालील आणि मोटार अपघात नुकसानभरपाईच्या दाखल झालेल्या प्रकरणामध्ये सुनावणीअंती न्यायनिर्णय करणे व प्रकरणे निकाली करणे.

| | | |
|---|---|---|
| | | ५. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना क्रमांक सीआरसी '१००६/१०६५(१३१) नऊ, दि.५/१/२००७ नुसार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ या अधिनियमाखालील प्रकरणे "विशेष न्यायाधीश" म्हणून चालविणे. |
| | | ६. दखलपात्र व अदखलपात्र गुन्हयातील प्रकरणामध्ये न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी यांनी न्यायनिर्णय करून निर्दोष घोषित करणेत आलेल्या आरोपीविरूध्दची सरकार पक्षाचे वतीने दाखल करणेत आलेली अपील चालविणे व त्यामध्ये सुनावणीअंती न्यायनिर्णय देणे. |
| ४. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर | : | १. दिवाणी नियमावली व दिवाणी प्रक्रियासंहिता नुसार व दहा लाखांपेक्षा जास्त आर्थिक मूल्य मर्यादा असलेली दिवाणी प्रकरणे तसेच शासनाने दाखल केलेली किंवा शासनाचे विरोधात दाखल झालेली दिवाणी प्रकरणे कायदेशीर पध्दतीचा अवलंब करून निकाली काढणे. |
| ५. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर | : | १. दिवाणी नियमावली व दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार व पाच लाखांपेक्षा कमी आर्थिक मूल्य मर्यादा असलेली दिवाणी प्रकरणे कायदेशीर पध्दतीचा अवलंब करून निकाली काढणे. |
| ६. मुख्य न्यायदंडाधिकारी | : | १. फौजदारी प्रक्रिया संहिताअन्वये गुन्हयाची दखल घेणे व त्यासंबंधी दाखल करण्यात आलेली फौजदारी प्रकरणे कायदेशीर पध्दतीचा अवलंब करून निकाली काढणे. मुख्य न्यायदंडाधिकारी हा त्याच्या कार्यकक्षेत काम करणा—या इतरन्यायदंडाधिकारी यांचा प्रमुख असतो. |
| ७. न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी | : | १. फौजदारी प्रक्रिया संहिताअन्वये गुन्हयाची दखल घेणे व त्यासंबंधी दाखल करण्यात आलेली फौजदारी प्रकरणे कायदेशीर पध्दतीचा अवलंब करून निकाली काढणे. |

२. बाल गुन्हेगारी कायद्यांतर्गत दाखल होणा—या सर्व प्रकरणात न्यायनिर्णय देणे.

कर्मचा—यांची वर्गवारी.

१. द्वितीय श्रेणी : १. प्रबंधक २. लघुलेखक, ग्रेड—१

२. तृतीय श्रेणी : १. लघुलेखक, ग्रेड—२ २. लघुलेखक, ग्रेड—३, ३. अधीक्षक ४. सहा.अधीक्षक ५. वरीष्ठ लिपिक ६. कनिष्ठ लिपिक ७. प्रमुख बेलिफ ८. बेलिफ ९. वाहन चालक.

३. चतुर्थ श्रेणी : १. झेरॉक्स ऑपरेटर २. पुस्तक बंधक ३. हवालदार/नाईक ४. शिपाई ५. हमाल ६. उदकी ७. सफाईगार.

कर्मचा—यांची कर्तव्ये.

## व्दितीय श्रेणी कर्मचारी

१. प्रबंधक : १. तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचा—यांच्या कामावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

२. प्रशासकीय कामात न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाची कर्मचा—यांकडून पूर्तता करवून घेणे.

३. न्यायिक कामात न्यायिक अधिका—यांनी पारीत केलेल्या आदेशाची संबंधित न्यायालय व पोलीस स्टेशन अधिका—यांना कामाची पूर्तता करणेबाबत कळविणे.

४. माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या अर्जाबाबत पूर्तता करणे.

५. दिवाणी नियमावलीच्या परिच्छेद ५९६ नुसार प्रशासकीय कामात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना मदत करणे

६. जिल्हा व सत्र न्यायालयाकडे हस्तांतरीत झालेल्या मौल्यवान मुद्येमालाची पडताळणी करणे व त्या संदर्भात सत्र न्यायालयाकडून पारीत झालेल्या आदेशाची अंमलबजावणी करून घेणे.

२. लघुलेखक, ग्रेड—१ : १. न्यायिक अधिकारी व कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितलेली सर्व कामे करणे.

२. सत्र न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील साक्षी पुरावे टंकलिखित करणे.

३. सत्र न्यायालयातील प्रकरणातील न्यायनिर्णयाचे व इतर आदेशांचे लघुलेखन करून टंकलेखन करणे.

## तृतीय श्रेणी कर्मचारी

१. लघुलेखक, ग्रेड—२ : १. न्यायिक अधिकारी व कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितलेली सर्व कामे करणे.

२. दिवाणी न्यायाधीश,व.स्तर/क.स्तर तसेच मुख्य व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील साक्षीपुरावे टंकलिखित करणे.

३. न्यायालयीन प्रकरणातील न्यायनिर्णयाचे व इतर आदेशांचे लघुलेखन करून टंकलेखन करणे.

२. लघुलेखक, ग्रेड—३ : १. न्यायिक अधिकारी व कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितलेली सर्व कामे करणे.

२. दिवाणी न्यायाधीश,व.स्तर/क.स्तर तसेच मुख्य व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील साक्षीपुरावे टंकलिखित करणे.

३. न्यायालयीन प्रकरणातील न्यायनिर्णयाचे व इतर आदेशांचे लघुलेखन करून टंकलेखन करणे.

३. अधीक्षक : १. वित्त विभाग/न्यायिक विभाग/निरीक्षणविभाग/सांख्यिकी विभागातील कर्मचा—यांच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे तसेच सत्र न्यायालयाकडे दाखल होणारी प्रकरणे, सर्व प्रकारची अपीले व पुर्नविलोकन प्रकरणे दाखल करून घेवून ती तपासणीअंती योग्य त्या न्यायिक अधिका—याकडे पुढील आदेशासाठी सादर करणे.

२. जिल्हा न्यायालय व इतर दुय्यम न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील दस्तऐवजांची तपासणी करून प्रतिज्ञार्थींचे प्रतिज्ञालेख नोंदविणे.

३. न्यायालयाकडे पक्षकारांनी मागितलेल्या दस्तऐवजांच्या नकला सत्यप्रती म्हणून प्रमाणित करणे.

४. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाकडे हस्तांतरीत झालेल्या सर्वसाधारण मुद्येमालाची पडताळणी करणे व त्या संदर्भात सत्र न्यायालयाकडून पारीत झालेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे.

५. वित्तीय विभागातील दैनंदिन रोखीच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.

६. दिवाणी, फौजदारी व मोटार अपघात प्रकरणातील न्यायालयाच्या आदेशानुसार गैरअर्जदार/उत्तरवादी यांना काढलेल्या आदेशिकांवर स्वाक्षरी करणे.

४. सहा. अधीक्षक : १. जिल्हा न्यायालयाच्या अधिनस्त असलेल्या दुय्यम न्यायालयात कार्यरत असणा—या तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचा—यांच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे, तसेच संबंधित न्यायालयाकडे नवीन दाखल होणारी सर्व प्रकारची दिवाणी व फौजदारी प्रकरणे दाखल करून घेवून ती तपासणीअंती योग्य त्या न्यायिक अधिका—यांपुढे आदेशासाठी सादर करणे.

२. अभिलेख विभागावर नियंत्रण ठेवणे व अभिलेख विभागातील पक्षकारांनी मागितलेल्या दस्तऐवजांच्या नकला प्रमाणित करणे.

३. न्यायालयाचे निरीक्षणासंबंधी व आवश्यकतेनुसार संबंधित कार्यालयाशी पत्रव्यवहार करणे.

४. वित्त विभागातील दैनंदिन रोखीचे व्यवहार करणे व रोकडवही लिहिणे.

५. न्यायालयाकडे पक्षकारांनी मागितलेल्या दस्तऐवजांच्या नकला सत्यप्रत म्हणून प्रमाणित करणे.

५. वरीष्ठ लिपिक : १. सर्व प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये साक्ष नोंदविणे, मासिक / त्रैमासिक / चौमासिक / सहामाही / वार्षिकविवरणपत्रे तयार करून जिल्हा न्यायालयास सादर करणे, तसेच प्रलंबित प्रकरणांचे ताळेबंद तयार करणे व निकाली प्रकरणांची नोंद "क" पत्रकात नोंदणे.

२. न्यायालयात दाखल होणारा मुद्देमाल दाखल करून घेवून त्यांची नोंदठेवणे तसेच निकाली प्रकरणातील मुद्देमालाची निकालपत्रातील आदेशाप्रमाणे विल्हेवाट लावणे.

३. न्यायालयात कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांची वेतनपत्रके, प्रवास भत्ता देयके व कार्यालयीन खर्चाची देयके तयार करून कोषागारास सादर करणे व आलेल्या रकमेचा हिशोब ठेवणे, तसेच विविध अग्रीम व कर्ज मिळण्याबाबतचे अर्ज मंजूरीकरिता संबंधित कार्यालयाकडे पाठविणे

४. न्यायालयात कार्यरत असणा—या कर्मचा—यांची सेवापुस्तके / सेवापटातील नोंदी अद्ययावत ठेवणे.

५. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयाकडून आलेल्या रिट, कागदपत्र मागणी रिट व आदेशिकांची अहवालासह पूर्तता करणे.

६. जिल्हा न्यायालय व दुय्यम न्यायालयात ग्रंथालयासाठी प्राप्त झालेल्या पुस्तकांची नोंदवहीत नोंद ठेवणे व ग्रंथालयीन पुस्तके सुस्थितीत ठेवणे.

७. अभिलेख कक्षातील दिवाणी व फौजदारी प्रकरणांचे नियमावलीनुसार नस्तीकरण करणे तसेच निकाली संचिका व इतर अभिलेख, अभिलेख कक्षात जमा करणे, तसेच अभिलेख कक्षातील सर्व अभिलेख सुस्थितीत ठेवणे.

६. कनिष्ठ लिपिक : १. दिवाणी व फौजदारी प्रकरणे हाताळणे व प्रलंबित प्रकरणांची प्रतिदिनी सूची तयार करणे.

२. न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांची संबंधित रजिस्टरमध्ये नोंद घेणे, दिवाणी प्रकरणात निकालाप्रमाणे हुकूमनामे तयार करणे, प्रकरणातील आदेशाप्रमाणे प्रलंबित प्रकरणात आदेशिका तयार करून बजावणीकामी पाठविणे. निकाली निघालेल्या प्रकरणातील दस्तऐवजांचे वर्गीकरण करून अभिलेख (मोस्टर) तयार करून ते अभिलेखागारात जमा करणे. तडजोडीने व काढून घेतलेल्या निकाली दिवाणी प्रकरणातील मुद्रांक फी परत करण्याचे प्रमाणपत्रे तयार करून संबंधितांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे देणे, तसेच पक्षकारांच्या मागणीप्रमाणे व न्यायालयीन आदेशान्वये प्रलंबित व निकालीप्रकरणातील मूळदस्तऐवज योग्य त्या रजिस्टरमध्ये नोंद घेवून संबंधितांना परत करणे.

३. अपिलीय न्यायालयाकडून आलेल्या आदेशांची नोंद संबंधित रजिस्टरमध्ये घेवून त्यातील आदेशाची पूर्तता करणे व तसा अहवाल अपील न्यायालयास सादर करणे.

४. न्यायालयाकडून जाणा—या व इतर न्यायालयाकडून येणा—या पत्रव्यवहाराची नोंद आवक जावक नोंदवहीत करणे तसेच त्याकामी वापर केलेल्या टपाल तिकीटांचा हिशोब ठेवणे.

५. पक्षकारांनी मागितलेल्या नकला/अपिलीय न्यायालयास आवश्यक असणारे पेपर बुक तयार करणे व ते संबंधितांना वितरीत करणे. नकलेबाबतचे सर्व प्रकारचे लेखे संबंधित रजिस्टरमध्ये नोंदणे.

६. अधीक्षक, सहा.अधीक्षक, वरीष्ठ लिपिक यांना मदतनीस म्हणून काम पहाणे.

७. प्रमुख बेलिफ : १. न्यायालयात कार्यरत असलेल्या बेलिफांना कामगिरी देणे व त्यांनी केलेल्या कामावर नियंत्रण ठेवणे.

२. कोषागार व बॅंकेसंबंधीची सर्व कामे करणे.

८. बेलिफ : १. न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशिकांचे संबंधितांवर बजावणी करणे.

२. कोषागार व बॅन्केसंबंधीची सर्व कामे करणे.

बाब क्रमांक ३: पर्यवेक्षण व जबाबदारी ठेवण्याच्या मार्गासह निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती.

१. भारतीय संविधानुसार अस्तित्वात आलेले प्रचलित कायदे,
२. मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेले आदेश व निर्गमित केलेली परिपत्रके.
३. दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली.
४. महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच शासनाने निर्गमित केलेले निर्णय व परिपत्रके.

बाब क्रमांक ४: आपली कामे पार पाडण्यासाठी त्याने निश्चित केलेली प्रमाणके.

१. भारतीय संविधानुसार अस्तित्वात आलेले प्रचलित कायदे,
२. मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेले आदेश व निर्गमित केलेली परिपत्रके.
३. दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली.
४. महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच शासनाने निर्गमित केलेले निर्णय व परिपत्रके.

बाब क्रमांक ५: आपली कामे पार पाडण्यासाठी त्याने धारण केलेले किंवा त्याच्या नियंत्रणाधीन असलेले किंवा त्या कर्मचा–यांकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, निर्देश, नियमपुस्तिका व अभिलेख.

१. भारतीय संविधानुसार अस्तित्वात आलेले प्रचलित कायदे,
२. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेले आदेश व निर्गमित केलेली परिपत्रके.
३. दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली.
४. महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच शासनाने निर्गमित केलेले निर्णय व परिपत्रके.

बाब क्रमांक ६: त्याने धारण केलेल्या किंवा त्याच्या नियत्रंणाधीन असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरणपत्र.

१. दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली नुसार निश्चित केलेल्या नोंदवहया विहीत नमुन्यात या जिल्हयाच्या प्रत्येक न्यायालयात ठेवण्यात येतात.

२. दिवाणी व फौजदारी नियमावलीतील तरतुदीनुसार न्यायनिर्णयांच्या व इतर दस्तऐवजांच्या प्रमाणित नकला संबंधित पक्षकारांना पुरविल्या जातात.

बाब क्रमांक ७: आपली धोरणे तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात जनतेतील कोणत्या व्यक्तीशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा त्यांना प्रतिनिधित्व करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल.

ही बाब जिल्हा न्यायालयास लागू होत नाही.

बाब क्रमांक ८: मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि त्यांचा भाग बनलेल्या किंवा त्यांना सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या इतर संस्थांचे आणि अशी मंडळे,परिषदा, समित्या व इतर संस्था, जनतेसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकांची कार्यवृत्ते जनतेस मिळण्यायोग्य आहेत किंवा कसे यासंबंधीचे विवरणपत्र.

दोन किंवा अधिक व्यक्ती मिळून संस्था, मंडळे, परिषदा व समित्या जिल्हा न्यायालय स्थापन करीत नाही, म्हणून बाब क्रमांक ८ ची माहिती निरंक

बाब क्रमांक ९: अधिका—यांची व कर्मचा—यांची निर्देशिका.

| अ.नं. | संवर्ग | एकूण पद संख्या |
|---|---|---|
| १ | प्रथम श्रेणी अधिकारी | ७५ |
| २ | द्वितीय श्रेणी अधिकारी | १४ |
| ३ | तृतीय श्रेणी कर्मचारी | ६८५ |
| ४ | चतुर्थ श्रेणी कर्मचारी | २१८ |
| | एकूण पद संख्या :— | ९९२ |

मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कांही नवीन कनिष्ठ स्तर न्यायालयांची निर्मिती अथवा त्यामध्ये घट वेळोवेळी होत असते, शिवाय न्यायिक अधिका—यांची बदली, बढती यामुळेही न्यायालयांच्या संख्येत चढउतार होत असतात.

बाब क्रमांक १०: विनियमामध्ये तरतूद केलेल्या भरपाईच्या तरतूदींसह त्याच्या प्रत्येक अधिका—यास व कर्मचा—यास मिळणारे मासिक पारिश्रमिक.

| अ.नं. | संवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| | **वर्ग—१** | |
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश | जे—६ रू. १६३०३०—२२९०९० |
| २ | जिल्हा न्यायाधीश— व अति.सत्र न्यायाधीश | जे—५ रू. १४४८४०—१९४६६० |
| ३ | तदर्थ जिल्हा न्यायाधीश व अति.सत्र न्यायाधीश | जे—५ रू. १४४८४०—१९४६६० |
| ४ | दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर/मुख्य न्यायदंडाधिकारी | जे—३ रू. १११०००—१६३०३० |
| ५ | दिवाणी न्यायाधीश, क. स्तर व न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे. | जे—१ रू. ७७८४०—१३६५२० |
| | **वर्ग—२** | |
| ६ | प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय | एस—२०, रू. ५६१००—१७७५०० |
| ७ | जिल्हा न्यायाधीशांचे स्विय सहाय्यक | एस—१७, रू. ४७६००—१५११०० |
| | **वर्ग—३** | |
| ८ | अधीक्षक | एस—१६, रू. ४४९००—१४२४०० |
| ९ | सहा. अधीक्षक | एस—१५, रू. ४१८००—१३२३०० |
| १० | लघुलेखक ग्रेड — १ | एस—१७, रू. ४७६००—१५११०० |
| ११ | लघुलेखक ग्रेड — २ | एस—१५, रू. ४१८००—१३२३०० |
| १२ | लघुलेखक ग्रेड — ३ | एस—१४, रू. ३८६००—१२२८०० |
| १३ | वरीष्ठ लिपिक | एस—०८, रू. २५५००—८११०० |
| १४ | कनिष्ठ लिपिक | एस—०६, रू. १९९००—६३२०० |
| १५ | प्रमुख बेलिफ | एस—०८, रू. २५५००—८११०० |
| १६ | बेलिफ | एस—०६, रू. १९९००—६३२०० |
| १७ | वाहन चालक | एस—०६, रू. १९९००—६३२०० |
| १८ | पुस्तक बंधक | एस—०६, रू. १९९००—६३२०० |
| | **वर्ग—४** | |
| १९ | झेरॉक्स ऑपरेटर | एस—०३, रू. १६६००—५२४०० |
| २० | हवालदार | एस—०४, रू. १७१००—५४००० |
| २१ | नाईक | एस—०३, रू. १६६००—५२४०० |

| अ.नं. | संवर्ग | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| २२ | शिपाई / हमाल / उदकी / सफाईगार | एस—०१, रू. १५०००—४७६०० |

बाब क्रमांक ११: सर्व आराखडयांच्या प्रस्तावित खर्चाच्या व केलेल्या संवितरणावरील अहवालांच्या तपशिलासह त्याच्या प्रत्येक एजन्सींना नियतवाटप केलेली अर्थसंकल्पीय तरतुद.

सोलापूर येथील जिल्हा न्यायालय या सार्वजनिक प्राधिकरणासाठी १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीसाठी मंजूर झालेल्या व खर्च झालेल्या रकमेचा तपशिल.

| अ. क. | अंदाजपत्रकीय शीर्ष | मंजूर रक्कम | वापर माहे मार्च २०२५ पर्यन्त |
|---|---|---|---|
| १ | **१०५ (०२) (०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश.** | | |
| | १. (०१) वेतन | ८२०२००००० | ७५३६१८४४० |
| | २. (०२) मजूरी | ० | ० |
| | ३. (०३) अतिकालीक भत्ता | ३६२००० | ३६१७८० |
| | ४. (०६) लाईट बिल, टेलीफोन व पाणी बिल | १४४०२६७३ | १३३३२९१८ |
| | ५. (१०) कंत्राटी सेवा | ७५६१६००० | ७५६१५९९८ |
| | ६. (११) प्रवास खर्च | ५७६१३२२ | ५७४९५५७ |
| | ७. (१३) कार्यालयीन खर्च | ५१६९४४४२ | ५१६८९०५१ |
| | ८. (१४) भाडेपट्टी व कर | १९६९४०६ | १९६९४०६ |
| | ९. (१६) प्रकाशने | ० | ० |
| | १०.(१७) संगणकावरील खर्च | ० | ० |
| | ११. (२८) व्यावसायिक व विशेष सेवाबद्दल प्रदाने | ४०००० | २८०१६ |
| | १२. (३१) सहाय्यक अनुदान | ० | ० |
| | एकूण रूपये :— | ९७००४५८४३ | ९०२३६५१६६ |
| २ | **११४ (००)(०२) मुफसील अधिकारी** | | |
| | १. (०१) वेतन | ९२६२००० | ८५१२८४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | २. (०६) लाईट बिल, टेलीफोन व पाणी बिल | ४५००० | २०७२३ |
| | ३. (११) प्रवास खर्च | १०००० | ० |
| | ४. (१३) कार्यालयीन खर्च | १२५००० | १२३५१२ |
| | ५. (१६) प्रकाशने | ० | ० |
| | ६. (१७) संगणकावरील खर्च | ० | ० |
| | ७. (२८) व्यावसायिक व विशेष सेवाबद्दल प्रदाने | १७०२८००० | १५११६३५० |
| | एकूण रूपये :— | २६४७०००० | २३७७३४२१ |
| | | | |
| ३ | **१०२(ix) उच्च न्यायालय (जलदगती न्यायालयांसाठी विशेष अनुदान)** | | |
| | १. (०१) वेतन | २२१०५००० | २२१९५४७६ |
| | २. (०६) दुरध्वनी, वीज व पाणी | ६५००० | ५६२१६ |
| | ३. (११) प्रवास खर्च | २२१०५१ | २२१०५१ |
| | ४. (१३) कार्यालयीन खर्च | १५९२२४९ | १५११२६४ |
| | ५. (१७) संगणकावरील खर्च | ० | ० |
| | ६. (२८) व्या.वि.से. | ४१३१५०० | ४१३१५०० |
| | एकूण रूपये :— | २८१२२८०० | २८२०३५८७ |
| ४ | **१०८ (००)(०१) फौजदारी न्यायालये** | | |
| | १. (०१) वेतन | ३५७१८००० | ३२६२७७१८ |
| | २. (०२) मजूरी | ० | ० |
| | ३. (०३) अतिकालीन भत्ता | २०००० | ११४४० |
| | ४.(०६) लाईट बिल, टेलीफोन व पाणी बिल | १४०००० | ६७०७१ |
| | ५. (१०) कंत्राटी सेवा | ० | ० |
| | ६. (११) प्रवास खर्च | २१४१७८ | २१४१७८ |
| | ७. (१३) कार्यालयीन खर्च | ६८४८१६० | ६८४२२६१ |
| | ८. (१४) भाडेपट्टी व कर | ० | ० |
| | ९. (१७) संगणकावरील खर्च | ० | ० |
| | १०. (२८) व्यावसायिक व विशेष सेवाबद्दल प्रदाने | ० | ० |
| | एकूण रूपये :— | ४३०२११३८ | ३९८५१४७६ |

बाब क्रमांक १२: **वाटप केलेल्या रकमा व अशा कार्यक्रमांच्या लाभार्थींच्या तपशिलासह अर्थसहाय्यित कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची रित.**

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर मार्फत कोणत्याही लाभार्थींना अर्थसहाय्य मंजूर केले जात नाही म्हणून बाब क्रमांक १२ ची माहिती निरंक आहे.

बाब क्रमांक १३: **त्याने दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे मिळणा–यांचा तपशिल.**

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कडून दिवाणी मार्गदर्शिका चॅप्टर ३२, परिच्छेद ६३४ नुसार खाली नमूद केलयाप्रमाणे सोलापूर येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये वकीलांचे कारकून म्हणून काम करणेचे परवाने संबंधित अर्जदारांना आजअखेर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | : | १४१ |
| पंढरपूर | : | ४७ |
| माळशिरस | : | ६७ |
| बार्शी | : | ५० |
| मंगळवेढा | : | ४० |
| मोहोळ | : | १९ |
| माढा | : | २६ |
| सांगोला | : | १५ |
| अक्कलकोट | : | ०६ |
| करमाळा | : | १९ |

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कडून दिवाणी मार्गदर्शिका चॅप्टर ३२, परिच्छेद ६३५ नुसार खाली नमूद केलयाप्रमाणे सोलापूर येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयाचे आवारात टंकलेखनाचे काम करणेचे परवाने

संबंधित अर्जदारांना आजअखेर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | : | ०६ |
| पंढरपूर | : | ०८ |
| माळशिरस | : | ०३ |
| बार्शी | : | ०३ |
| मंगळवेढा | : | ०१ |
| मोहोळ | : | —— |
| माढा | : | ०१ |
| सांगोला | : | ०३ |
| अक्कलकोट | : | ०१ |
| करमाळा | : | —— |

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कडून दिवाणी मार्गदर्शिका चॅप्टर ३१, परिच्छेद ६२६ नुसार खाली नमूद केलयाप्रमाणे सोलापूर येथील स्थानिक व तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये <u>पिटीशन रायटर</u> म्हणून काम करणेचे परवाने संबंधित अर्जदारांना आजअखेर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | : | ०१ |
| पंढरपूर | : | ०१ |
| माळशिरस | : | ०३ |
| बार्शी | : | ०३ |
| मंगळवेढा | : | ०२ |
| मोहोळ | : | ०२ |
| माढा | : | ०२ |
| सांगोला | : | ०१ |
| अक्कलकोट | : | ०३ |
| करमाळा | : | ०० |

दिवाणी न्यायालय, व.स्तर, सोलापूर या न्यायालयीन इमारतीचे आवारात एका व्यक्तीस न्यायालयीन मुद्रांकाची विक्री करणेचा परवाना देणेत आलेला आहे.

बाब क्रमांक १४: इलेक्ट्रॉनिक स्वरूपात विनिर्दिष्ट केलेली त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या किंवा धारण केलेल्या माहितीबाबतचा तपशिल

जिल्हा तथा तालुका न्यायालय संगणकीकरण

१.मा उच्च न्यायालय यांनी न्यायालयीन कामकाजाचे संपूर्णपणे संगणकीकरण करणेकामी मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या मार्गदर्शनाखाली ई कोर्ट प्रकल्पाची जिल्हा तथा तालुकास्तरावर अंमलबजावणी करणेकामी संगणक विभागाची स्थापना केली. सदरच्या संगणक विभागामध्ये खालीलप्रमाणे पदे निर्माण करुन त्या पदावर न्यायालयीन कर्मचारी मधूनच संगणकीय ज्ञान असलेल्या कर्मचा-यांना नेमण्यात आले. त्यानंतर सन २०१९ व सन २०२० मध्ये मा.उच्च न्यायालय यांनी कंत्राटी तत्वावर तांत्रिक पदवी असलेल्या उमेदवारांची प्रणाली अधिकारी (System Officer) म्हणून नेमलेले आहेत.

जिल्हा स्तरः
जिल्हा संगणक व्यवस्थापक (DSA) - 01
सह.जिल्हा संगणक व्यवस्थापक (Jt DSA) - 01
प्रणाली अधिकारी (System Officer on Contract Basis) – 02

तालुका स्तरः
तालुका संगणक व्यवस्थापक (TSA) - 01
सह. तालुका संगणक व्यवस्थापक (Jt TSA) – 01
जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे प्रणाली अधिकारी
(System Officer on Contract Basis) – 01

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये ई कोर्ट प्रकल्पयशस्वीरित्या राबविणेकरीता व दैनंदिन संगणकीय कामकाजामध्ये येणा-या अडचणींच्या निराकरण करणेकरीता जिल्हास्तरावर District Project Co-ordinator यांची नेमणुक करण्यात येते. तसेच प्रत्येक न्यायालयीन आस्थापनांचे संगणकीय कामकाज सुरळीतपणे चालणेकामी प्रत्येक तालुकास्तारावर नोडल अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात येताता. सर्व न्यायालयीन आस्थानान्वये संगणक समिती गठीत करण्यात येतात. सदरची समिती संबंधित नोडल अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संगणकीकरणाचे काजकाज पाहते

३. ई-कोर्ट प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सर्व न्यायालयीन आस्थापनांच्या संगणक समिती यांना मार्गदर्शन करणेकामी जिल्हास्तरावर जिल्हा न्यायालय संगणक समितीचे गठन करण्यात येते.

४. न्यायालयातील दैनंदिन संगणकीय समस्या तातडीने सोडविणेकामी सोलापुर जिल्हास्तरावर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्या आदेशान्वये संगणक विभागाचे काम दोन विभागामध्ये विभागण्यात आले. सदर दोन विभाग खालीलप्रमाणेः

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सर्वर विभाग | अ. | मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सूचनेनुसार सी.आय.एस. प्रणाली वेळोवेळी अदयावत करणे. |
| | | ब. | दैनंदिन आदेश / न्यायनिर्णय व इतर प्रकरणांचा डेटा एन.आय.सी. सर्वर येथे अपलोड करणे. |
| | | क. | दैनंदिन एस.एम.एस. पाठविणे. |
| | | ड. | जिल्हा न्यायालय, सोलापूर आवारामधील संगणकावर ऑपरेटिंग सिस्टीम प्रस्थापित करणे तथा प्रिंटर प्रस्थापित करणे. |
| २ | संगणक विभाग | अ. | संगणक, प्रिंटर दुरुस्तीबाबत सर्व कार्यवाही करणे. |
| | | ब. | संगणक साहित्यांबाबतचे जडवस्तू संग्रह नोंदवही अदयावत ठेवणे. |
| | | क. | संगणक साहित्यांची ए.एम.सी. दयावयाची झाल्यास त्याबाबत कार्यवाही करणे. |
| | | ड. | इतर संगणकीय हार्डवेअर बाबतची कार्यवाही करणे. |
| | | इ. या | सहा. अधिक्षक, अर्थ व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, सोलापूर विभागाच्या अंतर्गत कार्य करते. |

वरील तक्त्यामधील दोनही विभाग हे जिल्हा न्यायालय संगणक समिती, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली तथा सूचनेनुसार कार्य करतात.

५. ई कोर्ट प्रकल्पाच्या पहिल्या भाग अंतर्गत सोलापुर जिल्हा तथा तालुका न्यायालयीन संगणकीय कामकाजाकरीता पायाभुत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. त्याअंतर्गत न्यायायलयांकरीता संगणक, प्रिंटर पुरविण्यात आले. तसेच जिल्हा स्तर तथा तालुका स्तरावर सर्वर रुम (SR) न्यायिक सेवा विभाग (JSC) आणि लॅन प्रस्थापित करण्यात आले आहेत.

६ संगणकीकरण अंतर्गत न्यायालयीन प्रलंबित तथा निकाली प्रकरणांची माहितीचे संगणकीकृत करणेकरीता सी.आय.एस.(Case Information System) प्रणाली तयार करण्यात आली. सी.आय.एस. प्रणालीमध्ये संबंधित न्यायालयीन कर्मचारी दैनंदिन न्यायालयीन प्रकरणांची माहिती तथा त्यासंबंधिचे आदेश व न्यायनिर्णय अदयावत करतात.

७ ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत सन २०१३ मध्ये ecourts.gov.in हे संकेतस्थळ चालू करण्यात आले. ज्यावर सी.आय.एस. प्रणालीमध्ये रोजच्या रोज अदयावत होणारी माहिती ही परावर्तित होते. ज्याव्दारे पक्षकार व विधिज्ञ स्वतः त्यांच्या प्रकरणांची अदयावत माहिती घेऊ अथवा पाहू शकतात.

८. ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत देशातील सर्व जिल्हयांकरीता त्यांचे एक संकेतस्थळ तयार करण्यात आले. ज्याव्दारे त्या न्यायिक जिल्हयाची माहिती उपलब्ध करुन दिली जाते. सोलापूर जिल्हयाकरीता solapur.dcourts.gov.in हे संकेतस्थळ आहे ज्याचे अदयावतचे काम सर्वर विभाग पाहतो.

९ ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत पक्षकार तथा विधिज्ञ यांना न्यायालयीन प्रकरणांबाबत खालीलपर्यायाव्दारे सेवा घेता येते.

९.१. नवीन प्रकरणे दाखल करणेकामी, सर्व प्रकारच्या न्यायालयीन रकमा / दंड स्वीकारुन पावती देणेकामी, नकलेचे अर्ज स्वीकारुन त्याची पुर्तता करणेकामी इत्यादी करीता जिल्हास्तर तथा तालुका स्तरावर ज्युडिशियल सर्विस सेंटर (JSC) आहेत.

९.२. पक्षकार व विधिज्ञ यांना त्यांच्या प्रकरणाची दाखलबाबतची माहिती, निकाली झाल्याची माहिती तथा पुढील तारीखेची माहिती एस.एम.एस. सेवेव्दारे संगणक विभागामार्फत दिली जाते.

९.३ पक्षकार व विधिज्ञ यांचा ई मेल आयडी सी.आय.एस. प्रणालीमध्ये अदयावत असल्यास त्यांना त्यांच्या प्रकरणांची पुढील तारीख, आदेश / न्यायनिर्णय यांच्या कॉपीज ई मेलव्दारे प्राप्त होते.

९.४ इंटरनेटच्या वापराव्दारे प्रत्येक पक्षकार व विधिज्ञांना त्यांच्या प्रकरणांची सदयस्थिती ही ecourts.gov.in या संकेतस्थळावरुन घेता येते. जर प्रकरण निकाली झाले असेल तर न्यायनिर्णयाची प्रतसुध्दा त्यांना सदर संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेता येते.

१०. ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत न्यायिक अधिकारी व तसेच न्यायिक कर्मचारी यांना देखील प्रशिक्षीत प्रशिक्षकां मार्फत वेळोवेळी सी.आय.एस. प्रणालीचे आणि नव नवीन संगणकीय तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच जिल्हा प्रणाली प्रशासक (DSA) यांच्या मार्फत देखील तालुका प्रणाली प्रशासक (TSA) व इतर न्यायालयीन कर्मचारी यांस वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आले आहे

११. सन २०११ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई मार्फत पहिल्यांदा व्हीडीओ कॉन्फरंसिंग सेवा सुरु करण्यात आली. ज्याव्दारे जिल्हा कारागृहामध्ये न्यायिक बंदी असलेल्या कैदयांना व्हीडीओ कॉन्फरंन्स व्दारे न्यायालयासमोर हजर केले जाते. ज्यामुळे पोलीसांवरील कामाचा ताण थोडयाफार प्रमाणात कमी झाला.

१२. सन २०२० पासून ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत नॅशनल ट्रॅकिंग सिस्टीम फॉर इलेक्ट्रॉनिक प्रोसेस (NSTEP) सेवेची सुरुवात करण्यात आली आहे. ज्याव्दारे सुरुवातीला दिवाणी प्रकरणामधील कामगिरींची बजावणी बेलिफ हे मोबाईल सॉफटवेअरव्दारे करतील. याकरीता सर्व बेलिफ यांना मोबाईल देखील पुरविण्यात आले आहेत. यामुळे बजावणी वेळेत व तातडीने होण्यास मदत होईल.

१३. सन २०१५ मध्ये नवीन अदयावत व्हीडीओ कॉन्फरंन्सींग साहित्य पुरविण्यात आले ज्याव्दारे फक्त कारागृहामधील कैदीच नाहीतर प्रलंबित प्रकरणामधील साक्ष नोंदविणे व तपास अधिकारी यांचा जबाब घेणे अशी इतर प्रलंबित प्रकरणामधील कामकाज व्हीडीओ कॉन्फरंन्सींगव्दारे सुरु करण्यात आले. त्यामुळे प्रकरणे निकाली काढणे जलद आणि सोपे झाले.

१४. सन २०१९ मध्ये ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत eCourts Services चे मोबाईल ॲप देखील सुरु करण्यात आले आहे. सदरचे ॲप पक्षकार व विधिज्ञ त्यांच्या प्रलंबित अथवा निकाली प्रकरणाची स्थिती आपल्या मोबाईलव्दारे देखील पाहू शकतात.

१५ सन २०२१ मध्ये ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत जिल्हयाच्या ठिकाणी व तालुका ठिकाणी ई सेवा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. ज्याव्दारे समाजामधील गरीब, अशिक्षीत पक्षकार व गरजू विधिज्ञ यांना न्यायव्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणा-या सर्व ई सेवाबाबत मार्गदर्शन व सहाय्य करण्यात येईल.

१६. सन २०२१ मध्ये ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत ईपे (e-Pay) प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. सदर प्रणालीव्दारे पक्षकार तथा विधिज्ञ संबंधित न्यायालयीन आस्थापनाअंतर्गत न्यायालयीन प्रकरणांमध्ये भरावयाचे दंड,पेनल्टी,न्यायिक रक्कम तथा इतर देय ईपे (e-Pay) प्रणालीमार्फत भरु शकतात.

१७. सन २०२२ मध्ये ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत सर्व न्यायालयीन आस्थापनांकरीता Point of Sale (PoS) मशीन पुरविण्यात आले आहेत. ज्याव्दारे पक्षकार तथा विधिज्ञ हे न्यायालयीन प्रकरणामधील दंड, पेनल्टी, न्यायिक रक्कम तथा इतर रक्कम ऑनलाईनव्दारे भरणे शक्य झाले आहे.

१८. सन २०२२ मध्ये ई-कोर्ट प्रकल्प अंतर्गत फौजदारी न्यायालयांचे न्यायालयीन कामकाज Hybrid Mode of Hearing (Hybrid mode of hearing means conducting court proceeding in a combined physical and virtual manner) मध्ये करणेकामी आवश्यक कॅमेरे, स्पीकर, माईक प्रस्थापित करण्यात आले आहेत.

१९. सन २०२३ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये ई फाईलिंग सेवेचा शुभारंभ केला आणि सदरची सेवा सोलापुर जिल्हयामध्ये सर्व न्यायालयाकरीता सुरु करण्यात आली आहे.

२०. पक्षकार व विधिज्ञ हे ई सेवांबाबतच्या तक्रार निराकरणकामी तथा इतर मदत कामी जिल्हास्तर व तालुकास्तरावर असलेल्या कार्यालयांस ई मेलव्दारे आपली तक्रार कळवू शकता. त्याकरीता ई मेलआयडी खालीलप्रमाणेः

| आस्थापनाचे नांव | ई मेल आयडी |
|---|---|
| जिल्हा न्यायालय, सोलापूर | mahshodc@mhstate.nic.in; |
| दिवाणी न्यायालय व.स्तर, सोलापूर | mah-solcjsd@bhc.gov.in; |
| मुख्यन्यायदंडाधिकारी, सोलापूर | mah-solcjm@bhc.gov.in; |
| दिवाणी न्यायालय क.स्तर, (म्युनिसीपल कोर्ट) सोलापूर | mah-solmun@bhc.gov.in; |

| | |
|---|---|
| जिल्हा न्यायालय, पंढरपूर | mahsolpansc@indianjudiciary.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, व.स्तर, पंढरपूर | mah-solpancjsd@bhc.gov.in; |
| सह.दिवाणी न्यायालय, क.स्तर, पंढरपूर | mah-solpancjjd@bhc.gov.in; |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पंढरपूर | mah-solpanjmfc@bhc.gov.in; |
| जिल्हा न्यायालय, बार्शी | mah-solbaradj@bhc.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, व.स्तर, बार्शी | mahsolbarsc@indianjudiciary.gov.in; |
| सह.दिवाणी न्यायालय, क.स्तर, बार्शी | mah-solbarcjjd@bhc.gov.in; |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी | mah-solbarjmfc@bhc.gov.in; |
| जिल्हा न्यायालय, माळशिरस | mahsolmalsc@indianjudiciary.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, व.स्तर, माळशिरस | mah-solmalcjsd@bhc.gov.in; |
| सह.दिवाणी न्यायालय, क.स्तर, माळशिरस | mah-solmalcjjd@bhc.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर, मोहोळ | mahsolmohsc@aij.gov.in |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर, अक्कलकोट | mahsolakksc@indianjudiciary.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, व.स्तर, माढा | cjsd-madha@bhc.gov.in |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर, माढा | mahsolmadsc@indianjudiciary.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर, मंगळवेढा | mahsolmansc@indianjudiciary.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला | mahsolsansc@aij.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर, करमाळा | mahsolkarsc@indianjudiciary.gov.in; |
| दिवाणी न्यायालय, व.स्तर, करमाळा | cjsd-karmala@bhc.gov.in |

२०. ई कोर्ट सेवांबाबतची महत्वाची संकेतस्थळे खालीलप्रमाणेः

| | |
|---|---|
| E-Courts Services | https://ecourts.gov.in/ecourts_home/ |
| District Court Services | https://services.ecourts.gov.in/ecourtindia_v6/ |
| Official Website of district courts | https://districts.ecourts.gov.in/ |
| E-Fiilng V3.0 Portal | https://filing.ecourts.gov.in/pdedev/index.php |
| ePay- eCourts Digital Payment | https://pay.ecourts.gov.in/epay/ |

२१. ई कोर्ट प्रकल्प अंतर्गत विधिज्ञ तथा न्यायलयीन प्रकरणातील पक्षकार यांस देण्यात येणा-या ई-सेवांची माहिती तथा कालमर्यादा खालीलप्रमाणे

| अ.क्र | ई सेवा | कालमर्यादा |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | एस.एम.एस.सेवा ( न्यायालयीन प्रकरणातील पुढील तारीख व तत्सम माहिती ) | कार्यालयीन कामकाज दिवशी रोजच्या रोज |
| २ | ई मेल सेवा ( न्यायालयीन प्रकरणातील पुढील तारीख व तत्सम माहिती ) | कार्यालयीन कामकाज दिवशी रोजच्या रोज |
| ३ | न्यायालयीन प्रकरणांची माहिती<br>प्रकरण क्रमांकनुसार पक्षकारांच्या नावानुसार<br>इत्यादी | https://services.ecourts.gov.in/ecourtindia_v6/<br>(इंटरनेट सेवेमार्फत वरील संकेतस्थळाव्दारे २४ * ७ सेवा ) |
| ४ | न्यायालयीन प्रकरणामधील आदेश / न्यायनिर्णय यांची **PDF** | https://services.ecourts.gov.in/ecourtindia_v6/<br>(इंटरनेट सेवेमार्फत वरील संकेतस्थळाव्दारे संबंधित न्यायालयातील लघुलेखक याने अदयावत केल्यापासून २४ तासानंतर ) |
| ५ | ई पेमेंट न्यायालयीन प्रोसेस शुल्क प्रलंबित प्रकरणातील दंड, पेनल्टी अथवा इतर न्यायालयीन शुल्क | https://pay.ecourts.gov.in/epay/ या संकेतस्थळाव्दारे अथवा GRAS प्रणालीव्दारे |

## कलम ४ (१) (ब) (V)

नमुना (ब)

## सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे कामाशी संबंधीत शासन निर्णय

| अ. क्र. | शासन निर्णया नुसार दिलेले विषय | शासन निर्णय क्रमांक व तारीख | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|
| १ | विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी पारीत केलेले सर्व शासन निर्णय तसेच वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग यांनी या विभागाशी संबंधित पारीत केलेले सर्व शासन निर्णय या कार्यालयास लागू आहेत. | ---- | --- |

बाब कमांक १५ : **जर सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असतील तर ग्रंथालये किंवा वाचनालयांच्या वेळांसह, माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशिल.**

जिल्हा न्यायालय सोलापूर सार्वजनिकरित्या ग्रंथालय किंवा वाचनालय चालवित नाही, म्हणून याबाबतची माहिती निरंक आहे.

बाब कमांक १६ : **सार्वजनिक माहिती अधिका—यांची नांवे, पदनामे व इतर तपशिल.**

१. श्री. एम.के.ढोबळे
प्रबंधक तथा जन माहिती अधिकारी,
जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर.

२ श्री.आर.जे.कटारिया
जिल्हा व सत्र न्यायाधीश—१ तथा अपिलीय अधिकारी,
सोलापूर.

बाब कमांक १७ : **विहित करण्यात येईल अशी अन्य माहिती प्रकाशित करीत आणि त्यानंतर ही प्रकाशने प्रत्येक वर्षी अद्ययावत करील.**

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर कडून इतर माहिती प्रकाशीत केली जात नाही. विहीत माहिती प्रकाशीत करण्याचे व ती अद्ययावत ठेवण्याची तरतूद केली आहे.

Sharma

( मनोज एस. शर्मा )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सोलापूर.

दिनांक : २४/११/२०२५